# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १७ डिसेंबर, २०१५ / अग्रहायण २६, १९३७ ( शके )**

**(१) वित्त आणि नियोजन, वने मंत्री**
**(२) ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री**
**(३) जलसंपदा मंत्री**
**(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ९६**

---

### पती-पत्नी एकत्रिकरणाच्या धोरणानुसार शिक्षकांच्या आंतर जिल्हा बदलीचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(१) * ११९८१ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पती-पत्नी एकत्रिकरणाच्या धोरणानुसार शिक्षकांच्या आंतर जिल्हा बदलीचे सुमारे १२ हजार दांपत्यांचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सुमारे ७ ते १५ वर्षे सेवा झालेल्या दांपत्यांना सुध्दा पती-पत्नी एकत्रिकरणाखाली आंतर जिल्हा बदली मिळत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, लग्न होऊनही वेगवेगळे राहणाऱ्या शिक्षक दांपत्यांना एकत्र येऊन सुखाने संसार करता यावा यासाठी आंतर जिल्हा बदलीच्या निकषामध्ये बदल करण्याची मागणी होत असून याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(५) आंतर जिल्हा बदलीसाठी समान जात संवर्गाची अट रद्द करणे, रिक्त पदांवर पती-पत्नी दांपत्यांचा प्राधान्यांने विचार करणे, खाजगी शिक्षकांचे समायोजन जिल्हा परिषदेच्या शाळेत न करणे इत्यादी मागण्यांबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) जिल्हा परिषद शिक्षकांचे नियुक्ती प्राधिकारी हे संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे आहेत. त्यामुळे संबंधित शिक्षक आंतर जिल्हा बदलीकरिता त्यांच्याकडे अर्ज करीत असतात. त्यानंतर यांसदर्भातील राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित जिल्हा परिषदांकडून कार्यवाही करण्यात येते. सबब, यासंदर्भात प्रलंबित प्रस्तावांसंबंधीची नेमकी संख्या सध्या शासनस्तरावर उपलब्ध नसून सदर माहिती संकलित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

आंतर जिल्हा बदली ही दोन जिल्हा परिषदांमधील कार्यवाहीची बाब आहे राज्य शासनाच्या धोरणानुसार पती-पत्नी एकत्रिकरणासाठी संबंधित जिल्हा परिषदेमध्ये ३ वर्षांचा कार्यकाल पूर्ण केल्यानंतर आंतर जिल्हा बदलीस पात्र होतात. तद्नंतर अशा बदलीचे प्रस्ताव तपासताना संबंधित जिल्ह्यांतील शाळांची संख्या, या शाळांमधील विद्यार्थी संख्या, सदर शाळांमध्ये संबंधित शिक्षकाच्या नियुक्ती प्रवर्गाचे पद उपलब्ध असणे, प्राधान्य क्रम, अट शिथील केल्याचा प्राधान्यक्रम आणि सेवाज्येष्ठता या बाबी विचारात घ्याव्या लागतात.

(४) व (५) जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या आंतर जिल्हा बदलीबाबत या विभागाच्या दिनांक २९.९.२०११ च्या शासन परिपत्रकातील विहित मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात येते. समान जात संवर्गाची अट रद्द करता येणार नाही. कारण त्याचा परिणाम पदांच्या आरक्षणावर होऊ शकतो.

राज्यातील अनुदानित खाजगी शाळेतील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाबाबत शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक २८.११.२०१४ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही केली जाते.

-----------------

## गेवराई (जि.बीड) तालुक्यातील अमृता नदीचे पुनर्जीवन करणेबाबत

**(२) * ११८३० श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई तालुक्यातील अमृता नदीचे पुनर्जीवन करुन नदी पात्रात साखळी बंधाऱ्याची कामे मंजूर करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २ सप्टेंबर, २०१५ रोजी बीड येथील दुष्काळ आढावा बैठकीत या कामाचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमृता नदीच्या पुनर्जीवन कामाचे सर्व्हेक्षण करण्यास प्रत्यक्ष केव्हा सुरुवात होणार आहे,

(४) असल्यास, सदर कामास शासनाच्या कोणत्या योजनेतून निधी मंजूर केला जाणार आहे,

(५) असल्यास, दुष्काळी प्रदेशातील नदीचे पुनर्जीवन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, सर्व्हेक्षण व अंदाजपत्रक तयार करण्याच्या कामास झालेल्या विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे, खरे आहे.

गेवराई तालुक्यामध्ये अमृता नदीचे पुर्नज्जीवन करण्याबाबत लोकप्रतिनिधीनी जिल्हाधिकारी कार्यालयास निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

(२) सर्वसाधारण सूचना देण्यात आलेली आहे.

(३) सदर नदीवर सिमेंट नाला बांध या माध्यमातून पाणी अडविण्याकरीता आराखडा सादर केला आहे. कार्यकारी अभियंता, लघु सिंचन जलसंधारण यांना सदर कामाचे सर्वेक्षण करुन सविस्तर आराखडा सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी बीड यांच्याकडून देण्यात आलेले आहेत.

(४) नदीपुर्नज्जीवन कार्यक्रमातील सिमेंट नालाबांधास साखळी सिमेंट नाला बांध कार्यक्रमातुन निधी उपलब्ध करुन देण्यात येणार असुन उर्वरीत कामे अभिसरनातुन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत तसेच नदी पुनर्जीवन करण्यासंदर्भात शासन निर्णय, दि.८ डिसेंबर, २०१५ रोजी निर्गमित केला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्हयात तापी नदीवरील बॅरेजचे पाणी उपसा सिंचन योजनेतंर्गत शेतीला देण्याबाबत

**(३) * ११६९२ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्हयात तापी नदीवर बॅरेज बांधून अडविलेले पाणी शेतक-यांच्या शेतात उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून पोहचविण्याचे आश्वासनास एक वर्ष होऊनसुद्धा कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान उपोषणाला बसले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांचे त्वरीत उपोषण सोडवावे व सहकारी उपसा सिंचन योजना त्वरीत सुरू करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५ रोजी मा.जलसंपदा मंत्री महोदयांकडे निवेदनाद्वारे मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय
(२) होय.
(३) धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील २२ सहकारी उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक दुरुस्तीचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून पुढील प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिंधुदुर्ग जिल्हयात डॉक्टरांची रिक्त पदे, आरोग्य यंत्रणेतील त्रुटी तसेच दर्जेदार औषधांचा तुटवडा यामुळे रुग्णांची होणारी गैरसोय दूर करण्याबाबत**

**(४) * ११९४८ श्री.विजय गिरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्हयात डॉक्टरांची रिक्त पदे, आरोग्य यंत्रणेतील त्रुटी तसेच दर्जेदार औषधांचा तुटवडा यामुळे अत्याधुनिक उपचारपध्दती नसल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, साथीच्या रोगांची सातत्याने वाढ होत असून लेप्टो, डेंग्यू, स्वाईन-फ्ल्यू सारख्या आजाराने बरेच रुग्ण दगावत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच कणकवली उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांची रिक्त पदे तसेच अत्याधुनिक सेवा उपलब्ध नसल्याने रुग्णांना बाबुळी, गोवा व कोल्हापूर या ठिकाणी जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोल्हापूर किंवा गोवा या ठिकाणी रुग्णांना उपचारासाठी नेताना रुग्णांचा मृत्यू होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात १ जिल्हा रुग्णालय, ३ उपजिल्हा रुग्णालय, ७ ग्रामीण रुग्णालय व ३८ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित असून वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या १८८ मंजूर पदांपैकी १०५ पदे भरलेली आहेत. रिक्त पदावर १७ वैद्यकीय अधिकारी कंत्राटी पध्दतीने व ५ आयुष वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहे. सदर आरोग्य संस्थामध्ये साधनसामुग्री, उपकरणे, साहित्य, औषधे यांचा नियमित व पुरेसा पुरवठा करण्यात आला आहे. लेप्टो स्पायरोसीस, डेंग्यु, स्वाईन फ्ल्यू या आजारावरील उपचारांची सोय जिल्हा, उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयात उपलब्ध आहे. या आजारांचा फैलाव होऊ नये, याकरिता आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच केल्या आहेत.
(३) हे अंशत: खरे आहे.

अपघातात मेंदुला गंभीर इजा झालेल्या रुग्णांच्या विशेष उपचारासाठी आवश्यक असलेली सुविधा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शासकीय तसेच खाजगी रुग्णालयात उपलब्ध नसल्याने अशा रुग्णांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोवा येथे पाठविण्यात येते. सिंधुदुर्ग जिल्ह्यातून तापाने आजारी असलेल्या गंभीर रुग्णांना शासकीय महाविद्यालय गोवा व कोल्हापूर येथे संदर्भित करण्यात येते. सदर रुग्णांना मदत मिळण्यासाठी औषधे उपलब्ध करणे व समन्वय करण्यासाठी मदत कक्षाची स्थापना केलेली आहे.
(४) उपजिल्हा रुग्णालय कणकवली येथून एप्रिल, २०१५ ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत विविध आजारांचे एकूण ३१ रुग्ण शासकीय रुग्णालय बाबुळी, गोवा येथे पाठविण्यात आले असून त्यापैकी कोणत्याही रुग्णाचा उपचारासाठी नेताना मृत्यू झाल्याची नोंद नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ग्रामपंचायतींना लाखांवरील कामे दरकरार पध्दतीने करण्यासाठी अनुमती मिळण्याबाबत

**(५) * ११३७९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लाखांवरील कामे ई-निविदेद्वारा करण्याचा निर्णय राज्यातील काही ग्रामपंचायतींना अडथळा निर्माण करीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा ग्रामपंचायतींना दरकरार पध्दतीने कामे करण्यात अनुमती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) खरे नाही.

सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.मातंसं/नस्ती-२०१२/प्र.क्र.२७३/३९, दि.२६.११.२०१४ व दि.१८.१२.२०१४ अन्वये रु. ३ लाखापेक्षा अधिक खर्चाच्या कामांना ई.निविदा कार्यप्रणाली लागू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णय सर्व शासकीय विभागाच्या अधिनस्त कार्यालये तसेच ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक उपक्रम आणि मंडळे (माहिती अधिकार कायदा अधिनियम-२००५ मधील कलम ४ प्रमाणे) यांना बंधनकारक राहील असे नमूद केले आहे. तसेच ग्राम विकास विभागाचा शासन निर्णय क्र.निविदा-२०१४/प्र.क्र.२६०/पंरा-७, दिनांक २७.५.२०१५ अन्वये जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत स्तरावरील रु.३ लाख व त्यापेक्षा अधिक किंमतीच्या विविध विकास कामांना ई-निविदा कार्यप्रणाली लागू करण्यात आली आहे.

(२) सामान्य प्रशासन विभाग यांचा शासन निर्णय असल्याने तो सर्व प्रशासकीय विभागांना बंधनकारक असल्याने अशी कोणतीही कार्यवाही केलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयात जेसीबीची बनावट आर.सी. बुकद्वारे पासिंग केल्याबाबत**

**(६) * ११०९५ श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात जलयुक्त शिवाराची माहे मार्च, २०१४ मध्ये झालेल्या २८ कोटींच्या कामांमध्ये मालकी म्हणून दाखविलेले अनेक जेसीबीची बनावट आर.सी. बुकद्वारे पासिंग केल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात सन २००६ मध्ये ३८ ट्रकची बोगस पासिंग झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयात खुद्द प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्येच केवळ २०० जेसीबीची नोंदणी दाखविण्यात आली असतांना कृषी विभागाच्या दप्तरी मात्र जलयुक्तमध्ये ३७५ जेसीबी दाखविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

तथापि, माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये तीन यंत्रधारकांनी बनावट पासिंग केल्याचे वृत्त प्रकाशित झाले होते.

(२) होय, हे खरे आहे.

त्यासंदर्भात पोलीस ठाणे, यवतमाळ शहर येथे अप. क्र.४५/२००६, भा.दं.वि. कलम ४२०, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल झाला असून सद्यस्थितीत तपास प्रलंबित आहे.

(३) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियानात काम करणेसाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, यवतमाळ येथे नोंदणी झालेल्या १२५ जेसीबी धारकांनी नोंदणी केलेली आहे. त्याचप्रमाणे इतर जिल्हयातील २७ जेसीबी धारकांनी नोंदणी केलेली आहे. असे एकूण १५२ जेसीबी धारकांनी नोंदणी केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भामा-आसखेड धरणातून पुण्याला पाणी देताना पुणे महापालिकेने आकारलेले पैसे माफ करण्याबाबत**

**(७) * १२३७१ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामा-आसखेड धरणातून पुण्याला २.६ अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी देताना पुणे महापालिकेला आकारलेले रुपये १७५ कोटी शासनाने माफ करण्याची मागणी तत्कालीन माजी उपमुख्यमंत्री यांनी माहे ऑक्टोबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

तत्कालीन उपमुख्यमंत्र्यांनी भामा आसखेड धरणातून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला मंजूर केलेल्या पाणी आरक्षणामुळे कपात होणाऱ्या सिंचन क्षेत्राचा पुर्नस्थापना खर्च रु.२१७.०९१ कोटी माफ करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.

(२) होय,

(३) सिंचनाचे पाणी बिगर सिंचनासाठी वळविल्यामुळे कपात होणाऱ्या क्षेत्राची पुर्नस्थापना करणेसाठीची रक्कम संबंधितांकडून घेण्याचा धोरणात्मक निर्णय असल्याने ही मागणी मान्य केली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संजय गांधी राष्ट्रीय उद्याने व ठाणे परिसरातील वने जमिनीवरील इमारतींचा प्रश्न सोडविण्याबाबत

**(८) * ११२५६ श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाने मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका करणाऱ्या फक्त १९ याचिकाकर्त्यांना खासगी वने या शेऱ्यातून वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निर्णयामुळे बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान ते ठाणे परिसरातील वनजमिनींवर राहत असलेल्या सुमारे हजाराहून अधिक इमारतींतील रहिवाशांच्या अधिकृततेबाबत प्रश्न निर्माण झाल्याने दिनांक २५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रहिवाशांच्या घरांचा प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या स्पेशल लिव्ह पिटिशन्समधील सिव्हील अपिल क्रमांक ११०२ ते ११२०/२०१४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३०.०१.२०१४ रोजी दिलेल्या निर्णयानूसार शासन पत्र दिनांक १२.१२.२०१४ अन्वये प्रकरण निहाय कार्यवाही करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच शासन पत्र दिनांक ०६.०७.२०१५ अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ३०.०१.२०१४ रोजीच्या आदेशात नमूद १९ याचिकाकर्त्यांच्या प्रकरणांमधील क्षेत्राबाबत आवश्यक कार्यवाही होणे अपेक्षित असल्याबाबत कळविले आहे.

(२), (३) व (४) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ३०.०१.२०१४ रोजीच्या आदेशात नमूद १९ याचिकाकर्त्यांच्या क्षेत्राव्यतिरिक्त इतर प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश लागू होईल किंवा कसे याबाबत विधी व न्याय विभागाकडून अभिप्राय मागविण्यात आले आहे. सदर अभिप्राय विचारात घेवून याबाबत निर्णय घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## शिरोशी (ता.जव्हार, जि.पालघर) ग्रुपग्रामपंचायतीमध्ये इंदिरा आवास घरकुल योजनेत झालेला गैरव्यवहार

**(९) * १२०६० श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोशी (ता.जव्हार, जि.पालघर) ग्रुपग्रामपंचायतीमध्ये इंदिरा आवास घरकुल योजनेतील प्रतिक्षा यादीत नावे समाविष्ट असणाऱ्या लाभार्थ्यांना डावलून प्रतीक्षा यादीत नावे नसलेल्या अनेकांना घरकुलांचा लाभ देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेत काही मृत व्यक्तींच्या नावाने घरकुले देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कमठविरा (ता.जव्हार, जि.पालघर) येथील रघु टोपले यांचे नाव सन २००६-२००७ च्या इंदिरा आवास घरकुल योजनेत समाविष्ट असूनही त्यांना सदर योजनेचा लाभ मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तत्कालीन ग्रामसेवक श्री.माळी यांनी घरकुल योजनेत गैरव्यवहार केल्यामुळे त्यांची चौकशी करण्यासाठी गटविकास अधिकारी, जव्हार यांच्याकडे दिनांक ३ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) श्री.रघु टोपले यांचे नाव प्रतिक्षा यादीत आहे. तथापि, त्यांचे पक्के घर असल्याने त्यांना लाभ दिलेला नाही.

(४) होय, अशी तक्रार प्राप्त झाली आहे.

(५) लाभार्थी अपात्र असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जिंतूर (जि.परभणी) येथील तहसिलदारांनी केलेल्या कोट्यवधी रुपयांच्या महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या गैरव्यवहाराबाबत**

**(१०) * ११७८५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर (जि. परभणी) येथील तहसिलदारांनी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्यावरुन जिल्हाधिकारी, परभणी यांनी उपविभागीय अधिकारी, सेलू यांना संबंधितांविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्याचे आदेश माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय,

(२) उपविभागीय अधिकारी सेलु यांचे मार्फत दोषारोप पत्र तयार करण्याचे काम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील जलसंधारणाची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(११) * ११९७१ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पूर्वी मंजूरी देण्यात आलेली जलसंधारणाची सुमारे २,३०० कामे मा.जलसंधारण मंत्री यांनी दिनांक ४ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास रद्द केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त कामांचे कार्यादेशही दिले असून काही ठिकाणी २५ टक्क्यापर्यंत कामे पूर्ण झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जी कामे २५ टक्क्यापर्यंत पूर्ण झाली आहेत त्या कामांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत दिनांक १ एप्रिल, २०१४ नंतर तसेच दिनांक १ एप्रिल, २०१४ पूर्वी (विदर्भ वगळून) प्रशासकीय मान्यता दिलेल्या परंतु प्रत्यक्ष क्षेत्रिय कामे सुरु झालेली नाहीत अशा सर्व योजनांना (० ते २५० हेक्टर) महामंडळाकडून स्थगिती देण्यात आलेली असून तांत्रिक व्यवहार्यता तपासण्यासाठी मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) पुणे यांचेसह त्रिसदस्यीय समिती गठीत करण्याबाबत शासन निर्णय क्र. मजम-२०१५/प्र.क्र.६६/जल-३, दिनांक ८ मे, २०१५ रोजी निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने समितीने एकूण २,३३० योजनांचा तपासणी अहवाल दिनांक २८ जुलै, २०१५ अन्वये महामंडळास प्राप्त झाला असून, समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुषंगाने सदर अहवाल संचालक मंडळाच्या बैठकीत निर्णयास्तव ठेवण्यात आलेला असून संचालक मंडळाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**प्राईड बिल्डर्सच्या प्राईड वर्ल्ड सिटी (ता.हवेली, जि.पुणे) या प्रकल्पासाठी इंद्रायणी नदीच्या चऱ्होली बुद्रुक पात्रामधुन होणारा पाणी उपसा बंद करण्याबाबत**

**(१२) * ११५३५ श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राईड बिल्डर्सच्या प्राईड वर्ल्ड सिटी (ता.हवेली, जि.पुणे) या प्रकल्पासाठी इंद्रायणी नदीच्या चऱ्होली बुद्रुक पात्रामधुन पाणी उपसा बंद करण्यात यावा यासाठी स्थानिकांनी तलाठी कार्यालयासमोर आंदोलन केल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राईड बिल्डरविरोधात केलेल्या आंदोलनाची दखल घेऊन इंद्रायणीतून पाणी उपसा बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय,

(२) संस्थेस शासन स्तरावरुन ६ वर्ष कालावधीत बांधकामासाठी पाणी वापरण्यास परवानगी देण्यात आली असून संस्थेने आवश्यक सिंचना पुनर्स्थापना खर्च भरणा करुन करारनामा केलेला आहे. त्यामुळे पाणी उपसा बंद करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शासकीय रुग्णालयात जेनेरिक औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१३) * ११०३६ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय रुग्णालयामध्ये जेनेरिक औषधे उपलब्ध करुन द्यावे असा निर्णय प्रशासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने नेमलेल्या हाथी समितीने काही शिफारशी केलेल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शिफारशींवर तसेच जेनेरिक औषध विक्रिसंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

हाथी समितीने एप्रिल, १९७५ मध्ये केंद्र शासनास शिफारशी केल्या आहेत.

(३) दि. ६.९.२०११ च्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आरोग्य संस्थामध्ये जैनरिक औषधे खरेदी करण्याचे धोरण निश्चित केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अंगणवाडयांना पुरविण्यात आलेल्या निकृष्ट दर्जाच्या चिक्कीबाबत**

**(१४) * ११४६२ श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक ७१०३ ला दिनांक १४ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाड्यातील बालकांसाठी महिला व बालविकास विभागामार्फत दिनांक १३ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या आदेशान्वये खरेदी केलेली ७५ कोटी रुपये किंमतीची चिक्की बालकांपर्यंत पुरवठा केल्यानंतर सदर चिक्की खाण्यायोग्य नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर चिक्की खरेदी करण्यापूर्वी नियमानुसार कोणत्या बाबींची तपासणी/छाननी आवश्यक होती व त्यापैकी कोणत्या बाबींची केव्हा पूर्तता करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

राज्यात वाटप करण्यात आलेल्या राजगिरा चिक्की बाबत काही जिल्हयात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तक्रार प्राप्त चिक्कीचा पुरवठा बदलून घेणे, संबंधित उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून चौकशी अहवाल मागविणे, तक्रार प्राप्त चिक्कीचे नमुने घेऊन शासकीय प्रयोगशाळा/ NABL मान्यता प्राप्त प्रयोगशाळा यांचेकडे तपासणीसाठी पाठविणे व संबंधित तपासणी अहवाल प्राप्त करणे इ. बाबतची कार्यवाही वेळोवेळी करण्यात आलेली आहे.

(२) व (३) सदर चिक्कीची खरेदी करण्यापूर्वी नियमानुसार वस्तुंची उपयोगिता, क्षेत्रिय कार्यालयाची मागणी व खरेदीची कार्यपध्दती / दरकरार या बाबींची छाननी / तपासणी आवश्यक होती. या सर्व बाबींची वेळोवेळी पूर्तता करण्यात आलेली आहे.

-----------------

## लोखंडी सावरगांव (ता.अंबेजोगाई, जि.बीड) येथील रुग्णालयातील पदांना मान्यता मिळण्याबाबत

**(१५) * ११८०३ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोखंडी सावरगांव (ता.अंबेजोगाई, जि.बीड) येथे सार्वजनिक आरोग्य विभागाने १० वर्षापुर्वी स्त्री, वृध्दत्व व मनोरुग्णालय मंजूर केले असून सदर रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम पुर्ण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर रुग्णालयाचे रुपांतर सामान्य रुग्णालय म्हणून अस्तित्वात येणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयासाठीच्या २०३ पदांना मान्यता मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पदास मान्यता देवून रुग्णालय त्वरीत सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) शासन निर्णय दि.६.२.२००८ अन्वये वृध्दत्व आरोग्य व मानसिक आरोग्य केंद्राची स्थापना करण्यास मंजूरी देण्यात आली असून त्यांचे बांधकाम अद्याप पूर्ण झालेले नाही.

(२) अनुक्रमांक १ येथील नमूद केंदाऐवजी १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय सुरु करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) हे खरे आहे. तथापि, अनुक्रमांक २ येथील वस्तुस्थिती विचारात घेता निर्माण करावयाच्या पदसंख्येत बदल होण्याची शक्यता आहे.

(४) कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पेंच प्रकल्पाचे पाणी अडविण्याचा निर्णय मध्यप्रदेश शासनाने घेतल्याबाबत

**(१६) * १२३०७ श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहराला पाणीपुरवठा पेंच प्रकल्पातून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कराराप्रमाणे मध्यप्रदेश शासनाने हे पाणी जुलै, २०१६ पासून अडविण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मध्यप्रदेश शासनाने हे पाणी अडविल्यास राज्य शासनाच्या २८.७७ कोटी रुपयाच्या वीज निर्मितीत घट होवून ६३४.५ कोटी रुपयांच्या शेतपिकांसह एकूण ७११.५१ कोटी रुपयाचे नुकसान होणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यासाठी शासनाने काही पर्यायी योजना आखल्या आहेत काय, त्याचे स्वरुप काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) आंतरराज्य करारानुसार मध्यप्रदेश राज्याच्या हिस्याच्या पाण्यावर संकल्पीत केलेल्या मध्य प्रदेश हद्दीतील पेंच डायव्हर्शन (चौराई) प्रकल्पाचे घळभरणी सन २०१६ मध्ये प्रस्तावित असल्याचे मध्यप्रदेश राज्यातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या चर्चेचे अनुषंगाने समजते.

(३) चौराई धरणाची घळ भरणी झालेनंतर महाराष्ट्रातील पेंच प्रकल्पात सद्या येणाऱ्या येव्यात कपात अपेक्षित आहे. तथापि, पेंच डायव्हार्शन (चौराई) प्रकल्पासह मध्य प्रदेशाचे नियोजन करारानुसार मध्य प्रदेशाला अनुज्ञेय पाणी मर्यादेतच आहे. त्यामुळे आंतरराज्य करारानुसार महाराष्ट्रास अनुज्ञेय पाणी मिळणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अनसिंग वारला (जि.वाशिम) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१७) * १२५०९ श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनसिंग वारला (जि.वाशिम) येथील ३९ गावांमधील रुग्णांना आरोग्यसेवा पुरविणाऱ्या वारला प्राथमिक आरोग्य केंद्राचा कारभार सध्या ग्रामपंचायतीच्या दोन खोल्यांमध्ये सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारला प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दोन वैद्यकिय अधिकाऱ्यांची पदे मंजूर असूनही स्वत:ची इमारत नसल्यामुळे आवश्यक त्या उपकरणांचा फायदा रुग्णांना देता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत प्राथमिक आरोग्य केंद्रात जागा मिळण्याबाबत सभापती, आरोग्य समिती, जिल्हा परिषद, वाशिम यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, वाशिम यांच्यामार्फत गेले वर्षभर मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) जागा प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खामगांव (जि.बुलढाणा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपजिल्हा सामान्य रुग्णालयातील रिक्त पदे असल्याबाबत

**(१८) * १२५९८ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) शहरातील उपजिल्हा सामान्य रुग्णालयात व लाखनवाडा, अटाळी, रोहणा या प्राथमिक आरोग्य केंद्रातील व उपजिल्हा सामान्य रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची व परिचारीकांची रिक्त पदे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे असल्यामुळे रुग्णांना शहरात खाजगी रुग्णालयात उपचारासाठी यावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

सामान्य रुग्णालय खामगांव, जि.बुलढाणा येथे वैद्यकीय अधिकारी गट-अ, वर्ग-१ संवर्गाची एकुण १६ पदे मंजूर असून ३ पदे भरलेली आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची एकुण २० पदे मंजूर असून १९ पदे भरलेली आहेत. तसेच परिचारिका संवर्गाची ७५ पदे मंजूर असुन ५७ पदे भरलेली आहेत.

ग्रामीण रुग्णालय लाखनवाडा, जि.बुलढाणा येथे वैद्यकीय अधिकारी, गट-अ (वरिष्ठ), संवर्गाचे मंजूर १ पद रिक्त आहे. वैद्यकीय अधिकारी, गट अ संवर्गाची एकुण ३ मंजूर पदे रिक्त आहेत. तसेच अधिपरिचारीकांची एकुण ७ पदे मंजूर असून ३ पदे भरलेली व ४ पदे रिक्त आहेत.

प्राथमिक आरोग्य केंद्र अटाळी, ता.खामगांव, जि.बुलढाणा व प्राथमिक आरोग्य केंद्र, रोहणा, ता.खामगांव, जि.बुलढाणा येथे वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची ४ पदे मंजूर असलेली ४ पदे भरलेली आहेत. तसेच आरोग्य सेविकेची मंजूर असलेली ४ पदे भरलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांना शासकीय कर्मचा-यांप्रमाणे रजा सवलत मिळणेबाबत

**(१९) * १२४०२ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांनाही शासकीय कर्मचा-यांप्रमाणे रजा प्रवास सवलत/स्वग्राम प्रवास सवलत मिळावी यासाठी वित्त विभागाचा दिनांक १० जून, २०१५ रोजीचा शासन निर्णय लागू करण्याबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक भारतीचे प्रमुख कार्यवाहक श्री. सुभाष मोरे यांनी वित्त विभागाकडे दिनांक १२ जून, २०१५ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वित्त विभागाच्या सहमतीने सुधारित शासन निर्णय जारी करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे. शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनाही शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे रजा प्रवास सवलत / स्वग्राम प्रवास सवलत मिळावी यासाठी वित्त विभागाचा दिनांक १० जून, २०१५ रोजीचा शासन निर्णय लागू करण्याबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक भारतीचे प्रमुख कार्यवाहक श्री.सुभाष मोरे यांनी वित्त विभागाकडे दिनांक १२ जून, २०१५ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केली आहे.
(२) व (३) करिता शासनाने राज्य शासकीय अधिकारी /कर्मचाऱ्यांना देय असलेल्या रजा प्रवास सवलती संदर्भातील तरतूदींमध्ये सुधारणा केल्यानंतर त्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबतचे आदेश शालेय शिक्षण विभागाने, वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करणे अपेक्षित असल्यामुळे श्री.सुभाष मोरे यांचे पत्र, वित्त विभागाच्या दिनांक ०२ जुलै, २०१५ च्या पत्रान्वये शालेय शिक्षण विभागात, त्याबाबतचा प्रस्ताव सहमतीसाठी सादर करण्यासाठी पाठविण्यात आले आहे. शालेय शिक्षण विभागाकडून अद्याप प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

-----------------

## राज्यात डॉक्टरांची रिक्त पदे असल्याबाबत

**(२०) * १२६९७ श्री.महादेव जानकर, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.विजय गिरकर, श्री.राहुल नार्वेकर, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, डॉ.सुधीर तांबे, श्री.गुरुमुख जगवानी, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वैद्यकीय अधिकारी, जिल्हा वैद्यकीय अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, विशेषतज्ञ तसेच सार्वजनिक आरोग्य सेवेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह विविध ६००० रिक्त पदे असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सर्जरी, मेडिसिन, बालरोगतज्ज्ञ, भुलतज्ञ अशा क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर ग्रामीण भागात जाऊन काम करण्यास तयार नसून पदवी व पदवीप्राप्त डॉक्टरांना एक ते दोन वर्षाची शासकीय सेवा देण्याची सक्ती असतानाही बहुतांश डॉक्टर खाजगी रुग्णालयाला प्राधान्य देतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी व दुर्गम भागात स्त्री रोग तज्ञ, प्रसूती, रेडिऑलॉजी, नेत्र रोग तज्ञ, बालरोग तज्ज्ञ यांची आवश्यकता असून ग्रामीण भागात तज्ञ डॉक्टरांना आवश्यक असणारे मानधन, सोयीसुविधा देऊन रुजू होण्यासाठी तसेच रिक्त जागा भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

राज्यात सद्य:स्थितीत गट-अ ते गट-ड संवर्गाची एकूण ५३५७३ पदे मंजूर असून ३८९४५ पदे भरलेली व १४६२८ पदे रिक्त आहेत.

त्यापैकी महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ वर्ग-१ संवर्गाची एकुण १४८९ मंजूर पदे असून ६१८ पदे भरलेली व ८७१ पदे रिक्त आहेत.

तसेच, वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची एकुण ७२०० पदे मंजूर असून, ५५७१ पदे नियमित स्वरुपात भरलेली असून १६२९ पदे रिक्त आहेत. उक्त १६२९ रिक्त पदांपैकी २९३ पदांवर बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी व अस्थाई पदावर ३५१ वैद्यकीय अधिकारी (एकुण ६४४) आहेत. गट-क ची ३०२८८ पदे मंजूर असून २२६५५ पदे भरलेली आहेत. गट-ड ची १२५५७ पदे मंजूर असून ७९७८ पदे भरलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील इंदिरा आवास योजनेतील लाभार्थ्यांना घरकुलांचे वाटप करण्याबाबत

**(२१) * १२६३५ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात इंदिरा आवास योजनेमार्फत घरे मिळण्यासाठी सुमारे १७,८४७ लाभार्थ्यांची नोंद झाली असता सन २०१५-२०१६ या वर्षात केवळ १४३ जणांना घरकुलाचे वाटप करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुणे जिल्ह्यातील सदर इंदिरा आवास योजनेतील लाभार्थ्यांना जागेचा प्रश्न सोडवून घरकुले देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, स्वत:ची जागा नसलेल्या लाभार्थ्यांना जागा खरेदी करण्याकरिता प्रति लाभार्थी ५० हजार रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य देण्यासाठी “पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना” सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोसेखुर्द प्रकल्पांतर्गत आंभोरा उपसा सिंचन योजनेअंतर्गत येणारे कालवे व उपकालव्यांची दुरुस्ती व गाळ उपसा करण्याबाबत**

**(२२) * ११५९९ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.राजेंद्र मुळक, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोसेखुर्द प्रकल्पांतर्गत आंभोरा उपसा सिंचन योजनेची कामे ९५ टक्के झाल्याचा दावा करण्यात येत असला तरी तब्बल १५ वर्षापुर्वी तयार झालेले कालवे काही ठिकाणी तुटले आहेत तर उपकालवे बेशरमच्या झाडांनी आणि गाळाने भरले असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे काम पूर्ण होत असले तरी शेतकऱ्यांना त्याचा पूर्ण लाभ मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त उपसा सिंचन योजनेंतर्गत येणारे कालवे व उपकालव्यांची दुरुस्ती व गाळ उपसा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

कालव्यामध्ये गाळ साठलेला आहे. झाडे झुडुपे वाढलेले आहेत. तसेच काही ठिकाणी कालव्याचा भराव पावसामुळे क्षतीग्रस्त झाला आहे. मात्र सन २०१४-१५ मध्ये २६६९ हेक्टर सिंचन झाले आहे.

(२) व (३) कालव्याच्या देखभाल दुरुस्तीची अंदाजपत्रके तयार करणेत आली आहेत. दुरुस्तीचे काम लवकरच हाती घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पश्चिम विदर्भातील बेंबळा प्रकल्प पूर्ण करण्याबाबत**

**(२३) * ११११९१ श्री.राजेंद्र मुळक, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.राजेंद्र जैन, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व विदर्भातील गोसीखुर्द प्रमाणेच सन १९८३ पासून पश्चिम विदर्भातील सुरु झालेला सर्वात मोठा व महत्वाकांक्षी बेंबळा प्रकल्प अजून पूर्ण होऊ शकला नसल्याचे दिनांक २३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५३.९६८ हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या या प्रकल्पाची मूळ किंमत ५०.७६ कोटींवरुन आज ३२०० कोटींवर पोहोचली असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जवळपास ८० टक्के अर्थात १८७६ कोटी रुपये खर्च होऊनही हा प्रकल्प ४५ टक्केच पूर्ण असून अनेक ठिकाणी त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने शेतक-यांच्या शेतात पाणी जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकल्पाला झालेला विलंब, मुख्य कालवे, उपकालवे बांधण्यात झालेल्या चुका, गैरप्रकार यातील दोषींचा शोध घेऊन कारवाई करण्यात यावी, आतापर्यंत झालेल्या खर्चाचे ऑडिट करण्यात यावे, अशी मागणी होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

बेंबळा प्रकल्पाचे प्रत्यक्ष कामास जानेवारी-१९९३ मध्ये सुरुवात झालेली होती व मुख्य धरणाचे सांडव्यासह बांधकाम जून-२००७ मध्ये पूर्ण झालेले आहे. सद्य:स्थितीत मुख्य कालवा वितरण प्रणाली व बेंबळा प्रकल्पांतर्गत जलसाठ्यातून डेहणी उपसा सिंचन योजनेची कामे अंदाजे ७५% झालेली आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

बेंबळा प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता किंमतीस रु.५०.७६ कोटी दि.२०.०१.१९८३ नुसार मान्यता प्रदान केलेली होती, तथापि ही प्र.मा.व्यपगत झाल्यामुळे शासनाने या प्रकल्पास नव्याने प्र.मा.दि.१६/१०/१९९२ रोजी रु.१९०.३६ कोटी रुपयास प्रदान करुन प्रकल्पाचे बांधकाम १९९३ मध्ये सुरुवात झाली. प्रकल्पाची मंजूर तृतीय प्र.मा.किंमत रु.२१७६.२८ कोटी आहे. चतुर्थ सु.प्र.मा.प्रस्ताव किंमत अंदाजीत रु.३६३५ कोटी आहे.

(३) या प्रकल्पावर जून-२०१५ अखेर रु.१९०१.९१ कोटी खर्च झालेला आहे व प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम ८५ टक्के पूर्ण झालेले आहे. प्रकल्पाचे लाभ क्षेत्रात कालव्याद्वारे प्रत्यक्ष सिंचनास सन २०१०-११ पासून सरुवात झालेली आहे.

बेंबळा मुख्य कालवा सा.क्र.३८५८० वरुन निघणाऱ्या आष्टा वितरीकेच्या कि.मी १ ते ३ मधील भरावातून पाणी पाझरुन शेतीचे नुकसान होत असल्याचे आढळून आले.

(४) बेंबळा मुख्य कालव्यावरील सा.क्र.३८५८० मी.वरील आष्टा वितरीकेच्या कि.मी.१ ते ३ मधील भरावातून पाणी पाझरत असल्याचे आढळून आले, उपरोक्त कामाच्या निविदा कार्यान्वित आहेत. त्यानुसार मंजूर निविदेअंतर्गत पाझराबाबतच्या दुरुस्तीची कामे संबंधित ठेकेदाराच्या खर्चाने पूर्ण करण्यात येतील. तसेच अधिकारी / कर्मचारी यांचे पाझराबाबत खुलासे मागविण्यात आले असून प्राप्त होताच आवश्यक कार्यवाही करण्यांत येईल.

(५) होय, आष्टा वितरिकेच्या चौकशीत झालेल्या चौकशीतील अनियमिततेस जबाबदार असलेल्या संबंधितांवर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गेवराई (ता.गेवराई, जि.बीड) येथील कवडगाव पाझर तलावासाठी जमिनी संपादित झालेल्या शेतक-यांना वाढीव मोबदला मिळण्याबाबत**

**(२४) * ११७३६ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (ता.गेवराई, जि.बीड) येथील कवडगाव पाझर तलाव ६ साठी शेतक-यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या असून सदर तलाव सन २००० साली पूर्ण झालेला असून तसेच मा.न्यायालयानेही आदेश देवून भूसंपादित केलेल्या शेतक-यांना १५ वर्षाहून अधिक कालावधी होऊनही वाढीव मोबदला अद्यापपर्यंत देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.न्यायालयाने संबंधित शेतक-यांना वाढीव मोबदला तात्काळ देण्याचे आदेश दिल्यानंतरही बीड जिल्हयांच्या भुसंपादन विभागाच्या दुर्लक्षित धोरणामुळे १५ वर्षानंतरही वाढीव मोबदला न मिळाल्यामुळे सदरहू संबंधित शेतक-यांनी सामूहिक आत्महत्येचा इशारा मा.पालकमंत्री, जिल्हाधिकारी, बीड आदींकडे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्या दरम्यान दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित शेतक-यांना संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) गेवराई येथील कवडगाव पाझर तलाव क्र.६ बाबतचा भूसंपादन प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, बीड यांच्या कार्यालयाकडे आढळून येत नाही.

तथापि, गेवराई येथील कवडगाव मधील इतर प्रकरणाबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ) पाझर तलाव कवडगाव (एल.ए.आर. क्र.५४५/९९) मध्ये दि.०२/१२/२००८ रोजी शेतकऱ्यांना वाढीव मोबदला दिला आहे.

ब) गाव तलाव कवडगाव (एल.ए.आर. क्र.१२/०६) मध्ये दि.२४/०३/२०११ रोजी शेतकऱ्यांना वाढीव मोबदला दिला आहे.

क) पाझर तलाव कवडगाव क्र.१ ( एल.ए.आर. क्र.९९ ते १०१/०९) मध्ये दि.०७/१०/२०१५ रोजी शासनाने वाढीव मोबदला मंजूर केला आहे. तो

दि.२७/११/२०१५ रोजी उपविभागीय अधिकारी, बीड यांना प्राप्त झाला आहे. त्यानुसार शेतकऱ्यांना वाढीव मोबदला देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

ड) पाझर तलाव कवडगाव (एल.ए.आर. क्र.२४७ ते २७९/९९) मध्ये संबंधित शेतकऱ्यांना वाढीव मोबदला देण्यात आलेला नसून त्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी कवडगाव येथील तीन प्रकरणात वाढीव मोबदला मंजुर केला आहे.

तर एक प्रकरण शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यावर विहित नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**ठाणे जिल्हयातील प्राथमिक शिक्षकांचे पालघर जिल्हयात केलेले समायोजन रद्द करुन त्यांच्या मुळ ठाणे जिल्हयात बदल्या करण्याबाबत**

**(२५) * १२६१४ श्री.रामनाथ मोते, डॉ.अपूर्व हिरे, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयाचे ठाणे व पालघर जिल्हा असे विभाजन होण्यापूर्वी अनेक प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या पालघर जिल्हयात करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) ठाणे जिल्हयात शिक्षकांची शेकडो पदे रिक्त असल्याने पालघरमध्ये गेलेल्या प्राथमिक शिक्षकांना ठाणे जिल्हयात आणण्यासाठी काय निर्णय घेण्यात आला आहे,

(३) ठाणे जिल्हयाच्या नियोजन मंडळाच्या बैठकीत चर्चा झालेली असून पालघर जिल्हयात गेलेल्या सर्व शिक्षकांना ठाणे जिल्हयात परत आणण्याबाबत निर्णय घेऊ असे आश्वासन मा. पालकमंत्री महोदयांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(४) महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी याबाबत दिनांक २१ मार्च, २०१५ रोजी शासनास निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही. प्रतिवर्षीप्रमाणे अन्य कर्मचाऱ्यांबरोबर या जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांच्याही नियमित बदल्या करण्यात आल्या.

(२) ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाल्याने ठाणे व पालघर जिल्ह्यांच्या पदांच्या आरक्षण निश्चितीची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागामार्फत सध्या चालू आहे. सदर कार्यवाही झाल्यानंतर यासंदर्भात नियमानुसार योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(३) होय.

(४) होय.

(५) ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर जिल्ह्यामध्ये गेलेल्या शिक्षकांना मूळ ठाणे जिल्ह्यात येण्यासाठी आरक्षण निश्चितीची कार्यवाही झाल्यानंतर कार्यवाही करणे शक्य होईल. तसेच, अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाच्या अनुषंगाने सुधारीत धोरण शालेय शिक्षण विभागाकडून निश्चित करण्यात येत आहे.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाड्या व शाळांमध्ये कुपोषित व आजारी मुलांवर उपचार करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली बैठक

**(२६) * १२३४९ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाड्या व शाळांमध्ये बरीच मुले कुपोषित व आजारी असल्याने त्यांना उपचार करण्यासाठी माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीला १८ पैकी ५ रुग्णालयाचे प्रतिनिधी उपस्थित राहिल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ पाटबंधारे विभागांतर्गत प्रत्यक्ष सिंचनापेक्षा जास्त सिंचन झाल्याच्या अहवालाबाबत**

**(२७) * १२२६८ श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ पाटबंधारे विभागांतर्गत सन २०१०-११ ते २०१४-१५ या ५ वर्षाच्या काळात १ मोठा प्रकल्प, ५ मध्यम प्रकल्प, ७१ लघु प्रकल्प अशा ७७ प्रकल्पांच्या शेवटच्या टोकाला पाणी पोहचत नसताना उद्दिष्टापेक्षा सिंचनाचे क्षेत्र जास्त झाल्याचा अहवाल मा.मुख्यमंत्री महोदयांच्या भेटीच्यावेळी पाटबंधारे विभागाने दिला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार प्रत्यक्ष सिंचनापेक्षा जास्त सिंचन झाल्याचा चुकीचा अहवाल देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही, असा अहवाल देण्यात आलेला नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात जलयुक्त शिवार योजनेबाबत

**(२८) * १२०७४ श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.राजेंद्र जैन, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पावसाच्या अनियमिततेमुळे जमीन आद्रतेमध्ये घट झाल्याने शेतपिकांवर होत असलेला विपरीत परिणाम टाळण्यासाठी राज्य शासनाने जलयुक्त शिवार योजना दिनांक १५ ऑगस्ट, २०१५ पासून सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत किती जिल्ह्यात वा तालुक्यात जलयुक्त शिवार योजना राबविण्यात आली आहे,

(३) तसेच या योजनेवर आतापर्यंत शासनाने किती खर्च केला आहे,

(४) असल्यास, जलयुक्त शिवार योजनेमुळे किती प्रमाणात सिंचन दिल्यास सुमारे ६१०८४० हेक्टर सिंचन उपलब्ध झाले आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून राज्यात दिनांक ५ डिसेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे.

(२) सदर योजना राज्यात ३४ जिल्ह्यामधील सुमारे ३०२ तालुक्यांमध्ये राबविण्यात येत आहे.

(३) विविध यंत्रणा/विभाग सी.एस.आर. व लोकसहभाग यामधून सुमारे रु. १५७७.०० कोटी निधीची कामे दिलेली आहेत.

(४) जलयुक्त शिवार अभियानातून ऑक्टोबर अखेर पूर्ण झालेल्या कामामधून एक संरक्षित सिंचन दिल्यास सुमारे ६१०८४० हेक्टर संरक्षित सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे.

-----------------

## किनवट (जि.नांदेड) तालुक्यात वाढत असलेले कुपोषण

**(२९) * ११३४३ श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) तालुक्यात २८० बालके कुपोषित तर १ हजार २२८ बालके कुपोषणाच्या मार्गावर असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील बालकांमधील कुपोषण दुर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) प्रकल्पातील बालकांच्या कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी कुपोषित बालकांना दुप्पट आहार देऊन त्यांच्या पालकांचे समुदपदेशन करुन बाळाची काळजी कशी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन केले जाते. याशिवाय अंगणवाडी सेविका दररोज तर अंगणवाडी पर्यवेक्षिका हया दर आठवड्यात घरी भेटी देऊन बाळाची काळजी घेऊन आवश्यक तेथे संदर्भ सेवा व उपचार करुन बालकांची सुधारणा करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रेशीम उद्योग विकास योजना संपूर्ण राज्यात राबविण्याबाबत**

**(३०) * ११५०४ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत बीड, जालना व औरंगाबाद येथे प्रायोगिक तत्त्वावर यशस्वीपणे राबविण्यात आल्यानंतर आता रेशीम उद्योग विकास योजना संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय शासनाच्या नियोजन विभागाने घेतला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) याप्रकरणी दिनांक ०३/०९/२०१५ च्या शासन निर्णयाची प्रत सर्व जिल्हयांना वितरीत केली असून विभागीय स्तरावर कार्यशाळा आयोजित करुन मनरेगा कार्यप्रणालीची माहिती देण्याबाबत सुचना रेशीम संचालनालयाद्वारे देण्यात

आलेल्या आहेत. त्यानुसार औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागामध्ये मनरेगा कार्यप्रणालीबाबत कार्यशाळा घेण्यात आलेल्या आहेत. पुणे विभागात कार्यशाळा घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे, नंदुरबार या आदिवासी बहुल जिल्हयात १ ते ६ वर्षे वयोगटातील ३०० बालिकांचा कुपोषणामुळे मृत्यु झाल्याबाबत

**(३१) * १२१०७ श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राजेंद्र जैन, श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ६८८५ ला दिनांक २१ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, नंदुरबार या आदिवासी बहुल जिल्हयात १ ते ६ वर्षे वयोगटातील ३०० बालिकांचा कुपोषणामुळे मृत्यू झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, या जिल्हयातील बाल मृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी गरोदर व स्तनदामाता आणि लहान मुलांच्या पोषणासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

ठाणे व नंदुरबार जिल्हयातील माहे जानेवारी, २०१५ ते ऑगस्ट, २०१५ या कालावधीतील बालमृत्यूबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| जिल्हा | एकुण जन्म | ० ते १ वर्ष मृत्यू | बालमृत्यू १ ते ६ वर्ष | एकुण ० ते ६ वर्ष मृत्यू |
|---|---|---|---|---|
| ठाणे | ११८५९ | ८५ | ४० | १२५ |
| नंदुरबार | १३८८८ | २३५ | ११६ | ३५१ |

सदरचे बालमृत्यू हे कुपोषणामुळे मृत्यू झालेले नसून विविध आजारामुळे झालेले आहेत.

(२), (३) व (४) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडीतील ६ महिने व ३ वर्ष वयोगटातील बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता तसेच ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील तीव्र कमी वजनाची बालके यांना घरपोच आहार (THR) आणि ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांना सकाळचा नास्ता व गरम ताजा आहार (HCM) पुरविण्यात येतो. तसेच अंगणवाडीतील बालके, गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांची दरमहा आरोग्य विभागाकडून तपासणी करण्यात येते व त्यानुसार संदर्भ सेवा देण्यात येतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पातोंडा (ता.अमळनेर, जि.जळगांव) येथील नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीसाठी निधी मिळण्याबाबत**

**(३२) * ११८८६ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पातोंडा (ता.अमळनेर, जि.जळगांव) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र इमारतीची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरील इमारत जीर्ण असल्याने ती पाडून नवीन इमारतीसाठी ग्रामीण पायाभूत विकास निधी NRHM किंवा (नाबार्ड) अंतर्गत मंजूर करण्याचा प्रस्ताव आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, जळगांव यांनी त्यांचा दिनांक २४ जुलै, २०१४ च्या पत्रान्वये सह संचालक, आरोग्य सेवा यांचेकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या पत्राच्या अनुषंगाने उपरोक्त आरोग्य केंद्राचा इमारत निधी मंजूर केला आहे काय व किती निधी मंजूर आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात ऑनलाईन लॉटरी विक्रेत्यांनी बनावट पत्त्यावर नोंदणी केल्याबाबत**

**(३३) * ११६६१ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ऑनलाईन लॉटरी विक्रेत्यांबरोबरच परराज्यातील लॉटरी विक्रेत्यांनी बनावट पत्त्यावर नोंदणी करुन शासनाचा ९५० रुपये कोटीहून अधिक महसूल बुडविल्याबाबत लोकप्रतिनिधीनी तक्रारी केल्या असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुडविलेल्या थकबाकीची वसूली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) महाराष्ट्र राज्याची ऑनलाईन लॉटरी चालू नाही. सन २००७ ते २००९ या कालावधीतील अन्य राज्याच्या पुढील प्रवर्तक कंपन्याकडे रु.९३३.१४ कोटी इतकी लॉटरी कराची रक्कम थकीत रक्कम थकीत आहे.

१) मे.स्वागत एजन्सी रु.७६.२२५ कोटी

२) मे. समर्पण ट्रेडिंग प्रा. लि. रु.१३४.४३ कोटी.

३) मे. केनलॉट गेमिंग सॉल्युशन प्रा. लि. रु.९.६८ कोटी व रु. २८.३० कोटी.

४) मे. ज्युपिटर गेमिंग प्रा. लि. रु.३२३.०५५ कोटी.

५) मे. एस. एल. मार्केटिंग रु.१३३.१४५ कोटी.

६) मे. श्वेता एंटर-प्रायझेस रु.२२८.३०५ कोटी.

(२) व (३) महाराष्ट्र राज्यात लॉटरी तिकीट विक्री करण्यात येणाऱ्या सर्व लॉटरी सोडतींवर आगाऊ लॉटरी कर भरणे महाराष्ट्र लॉटरी-यांवरील कर अधिनियम २००६ अनुसार लॉटरी प्रवर्तकांना (प्रथम विक्रेत्यास) बंधनकारक करण्यात आलेले आहे. तथापि, इतर राज्यांच्या लॉटरी प्रवर्तकांनी महाराष्ट्र लॉटऱ्यांवरील कर अधिनियम २००६ विरोधात उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केल्या होत्या. उच्च न्यायालयाने कठोर कारवाई न करण्याबाबत अंतरिम आदेश दिले. सदर अंतरिम आदेशाचा फायदा घेऊन परराज्याच्या लॉटरी प्रवर्तकांनी लॉटरी कर भरणा केला नाही. उच्च न्यायालयाने दाखल याचिकांवर सन २००९ मध्ये अंतिम निर्णय दिला. त्यात राज्य शासन लॉटरी कर लावण्यास व वसूल करण्यास सक्षम असल्याचा निर्णय दिला. उच्च न्यायालयाच्या दि. १४/८/२००९ च्या अंतिम निर्णयानंतर सर्व प्रवर्तक दि. २६/१०/२००९ पासून नियमितपणे आगाऊ लॉटरी कर भरणा करीत आहेत. त्यामुळे सन २००९ नंतर लॉटरी कराची थकबाकी नाही.

सन २००७ ते २००९ या कालावधीतील रु. ९३३.१४ कोटी इतकी लॉटरी कराची थकबाकी वसूली करीता संबंधीत राज्यांकडून चालविण्यात आलेल्या लॉटरी योजनांची माहिती पत्रव्यवहार करुन घेण्यात आली. संबंधीत राज्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे कर आकारणी आदेश व कर मागणी आदेश निर्गमित करण्यात आले. तथापि, संबंधित थकबाकीदार कंपन्यांनी लॉटरी कर भरणा केला नाही म्हणून महाराष्ट्र लॉटऱ्यांवरील कर अधिनियम, २००६ मधील कलम १८ नुसार जमीन महसूलाच्या वसूली प्रमाणे थकीत लॉटरी कर वसूल करण्याकरिता संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात आले होते.

तथापि, थकबाकीदार प्रवर्तक कंपन्या त्यांनी दिलेल्या पत्यावर आढळून येत नाही, असे जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे. आता पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**भंडारा व गोंदिया जिल्हयात बांबू वृक्ष तोडीवर वन विभागाने निर्बंध आणल्याबाबत**

**(३४) * १२५५४ श्री.राजेंद्र जैन, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा व गोंदिया जिल्हयात बांबू वृक्ष तोडीवर वन विभागाने निर्बंध आणल्याने बांबूपासून सुप, टोपली, चटई इ. बनविणे हा पारंपारिक व्यवसाय करुन त्यावरच अवलंबून असणारे बुरुड कामगार बेरोजगार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, ३०-३२ वर्षापासून शासनाने बुरुड कामगारांसाठी सुरु केलेले बांबु विक्री केंद्र आता बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार बांबू विक्री केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) भंडारा व गोंदिया जिल्हयात बांबू वृक्ष तोडीवर वन विभागाकडून निर्बंध आणलेले नसून कार्य आयोजनेप्रमाणे मंजूर कृपा मधून बांबूची तोड वन विभागामार्फत करण्यात येत असून बूरुड कामगारांना त्यांच्या मागणीप्रमाणे बांबूचा पुरवठा निस्तार दरावर करण्यात येत आहे.

(२) निस्तार आगार बंद करण्यात आलेले नाही.

(३) चौकशी प्रश्न उद्भवत नाही.

(४) बुरुडांना निस्तार दरावर बांबू नियमित उपलब्ध होत असल्याने यास विलंब झालेला नाही.

-----------------

**सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत आठ विषयातील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत**

**(३५) * १२६९१ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १०३५७ ला दिनांक २८ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील रुग्णालयामध्ये स्पेशालिस्ट डॉक्टर्सची भासत असलेली उणीव विचारात घेवून सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत नेत्ररोग, स्त्रीरोग व प्रसुती, बालरोग, शरीर विकृतीशास्त्र, भूल, मानसोपचार, क्षयरोग, रक्तसंक्रमण या आठ विषयातील पदव्युत्तर पदविका अभ्यासकम सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी सन २०१५-१६ पासून करण्याचे प्रस्तावित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्नाधीन बाब १ मधील निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय आणि त्यानुषंगाने विविध विषयातील २ वर्षाचा कालावधी असलेले नवीन ८ पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम प्रत्यक्षात सुरु करण्यात आले आहेत काय,

(४) नसल्यास, ग्रामीण भागातील रुग्णालयामध्ये स्पेशालिस्ट डॉक्टरांची भासणारी उणिव विचारात घेवून सदरील निर्णयाची अंमलबजावणी केव्हापर्यंत करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) दि. २७ नोव्हेंबर, २०१५ रोजी समुपदेशनाद्वारे ३६ उमेदवारांची निवड करण्यात आली असून सीपीएस कोर्सेसची पहिली बॅच दि. ०१.१२.२०१५ पासून सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------------------------

**यवतमाळ जिल्हा परिषदेमध्ये ग्रामसेवकाच्या नियुक्तीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(३६) * १२७४१ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषद ,पंचायत समिती विभागाकडून ग्रामपंचायत कर्मचारी सेवा जेष्ठतेनुसार ग्रामसेवक म्हणून देण्यात येणाऱ्या नियुक्तीमध्ये गैरप्रकार झाल्याचे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) नाही.

हिंदी विद्यापीठ मुंबई भाषारत्न (इन्टर हिंदी स्तर) परीक्षा उत्तीर्ण असण्याचे प्रमाणपत्र सादर करणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना कंत्राटी ग्रामसेवक या पदी नियुक्ती देण्यात आली होती. मात्र, सदर अर्हता केवळ हिंदी शिक्षकांच्याच बाबतीत लागु होते असे निदर्शनास आल्यानंतर, संबंधित कंत्राटी ग्रामसेवकांना उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु त्यांनी नियमित विभागीय मंडळाचे १२ वी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदरील ६ ग्रामपंचायत कर्मचारी कंत्राटी ग्रामसेवक या पदाकरिता आवश्यक अर्हता पूर्ण करीत नसल्याने त्यांना दि. ३१.१.२०१५ पासून त्यांना जिल्हापरिषद सेवेतून कमी करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे येथील नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचे लवासा स्मार्ट सिटीने अर्धा टीएमसी पाणी अडविल्याबाबत**

**(३७) * १३०२० श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचे लवासा स्मार्ट सिटीने अर्धा टीएमसी पाणी अडविल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे. लवासा कंपनीने जलसंपदा विभागासमवेत केलेल्या करारनाम्यानुसार पुणे शहरास पुरविण्यात येणाऱ्या खडकवासला प्रणालीतील वरसगाव धरणाच्या जलाशयामध्ये बांधण्यात आलेल्या २ बंधाऱ्यांमध्ये एकूण ०.२८४ टिएमसी इतका पाणीसाठा अडविण्यात आलेला आहे. करारनाम्यानुसार सदरचे उडविलेले पाणी आवश्यकतेनुसार सोडण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## नाशिक जिल्ह्यातील दारणा धरणातून पाण्याचा विसर्ग

**(३८) * १३१५५ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील दारणा धरणातून गेल्या काही दिवसात पाण्याचा मोठ्या प्रमाणात विसर्ग झाल्याने या धरणातील पाणीसाठा निम्म्याहून कमी झाला असल्यामुळे येत्या काळात धरणालगतच्या गावांना पाणी टंचाई निर्माण होणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही, माहे ऑगस्ट, २०१५ अखेर दारणा धरणात ५३ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध होता.

(२) शासन निर्णय क्र.MCY/२०१५/प्र.क्र.२९०/८म-७ दि.०७.०९.२०१५ नुसार धरणातील पाणीसाठा अग्रहक्काने पिण्यासाठी राखून ठेवण्याचे तसेच जिल्हाधिकारी यांचे परवानगी शिवाय कोणत्याही प्रयोजनाचे पाणी न सोडण्याचे आदेश निर्गमित केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक महामपाडा मार्गावरील कसारा कामटीपाडा आदिवासी पाड्यात ४ वर्षीय बालिकेचा बिबट्याने बळी घेतल्याबाबत**

**(३९) * १३२५०  श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महामपाडा मार्गावरील कसारा कामटीपाडा आदिवासी पाड्यात झोपलेल्या ४ वर्षीय बालिकेचा बिबट्याने बळी घेतल्याचे दिनांक ११ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बिबट्याने बळी घेतलेल्या बालिकेच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) कामटीपाडा येथे दिनांक ११.१०.२०१५ रोजी कु.दिपाली काशिनाथ भगत वय वर्ष ३ या मुलीचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे.

(२) व (३) मृत मुलीचे कायदेशीर वारसास प्रचलित शासन निर्णयानुसार आर्थिक मदत म्हणून रु. ०८.०० लक्ष दिनांक १७.११.२०१५ रोजी देण्यात आलेले आहेत.

-----------------

**राज्यात स्वाईन फ्लुच्या रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांसाठी आवश्यक असलेल्या एन-९५ मास्कचा पुरवठा करण्याबाबत**

**(४०) * १३२५२  श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वाईन फ्लुच्या रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांसाठी आवश्यक असलेल्या एन-९५ मास्कचा राज्यातील रुग्णालयांमध्ये तुटवडा असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एन-९५ मास्कचा पुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

३१ ऑगस्ट, २०१५ रोजी राज्यात १५२९३ एन ९५ मास्क उपलब्ध होते.

(२) एन ९५ मास्क हा काही विशिष्ट परिस्थितीत केवळ डॉक्अर अथवा संबंधितांना वापरण्याची आवश्यकता भासते. आवश्यकतेनुसार या मास्कचा पुरवठा भारत सरकार मार्फत करण्यात येतो. तसेच राज्य अथवा स्थानिक पातळीवरही त्याची खरेदी केली जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वाडा (जि.पालघर) येथील विविध ग्रामीण रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्‌यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४१) * १३४४० श्रीमती विद्‌या चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) येथील कुडुस, खानिवली, गोऱ्हा, परळी व गारगांव ग्रामीण रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्‌यकीय अधिकाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्याने आदिवासी रुग्णांना उपचार मिळण्यास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपचाराअभावी रुग्णांचा मृत्यू होत असल्याने तात्काळ पदे भरण्याच्या मागणीसाठी श्रमजीवी संघटनेने पंचायत समिती कार्यालयावर दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यात १ ग्रामीण रुग्णालय, ४ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित असून, वैद्‌यकीय अधिकारी गट-अ व गट-ब ची १४ पदे मंजूर असून १२ पदे भरलेली आहेत व २ पदे रिक्त आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) वाडा तालुक्यात गट-अ ते गट -ड संवर्गाची एकूण १८८ पदे मंजूर असून १६६ पदे भरलेली व २२ पदे रिक्त आहेत.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ संवर्गाची रिक्त पदांपैकी नामनिर्देशांची व पदोन्नतीची पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

वैद्यकीय अधिकारी, गट-अ ग्रेड पे ५४००/- संवर्गाची रिक्त पदे स्थायी स्वरुपात भरण्याकरीता निवड मंडळाकडून शिफारसप्राप्त उमेदवारांची समुपदेशनाने शासन निर्णय १.१०.२०१५ च्या नियुक्ती आदेशाद्वारे २३६ विशेषज्ञ व शासन निर्णय दिनांक १८.११.२०१५ अन्वये ४६६ एमबीबीएस अर्हताधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

गट-अ व गट-क संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माणगांव (जि.रायगड) या गावातील तरुणांना सिरोप्लास्ट कंपनीत रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४२) * १३४५९ श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरील माणगांव (जि.रायगड) जवळील साले ग्रामपंचायतीने सिरोप्लास्ट कंपनीला १५ एकर जागा विना मोबदला देवून त्या बदल्यात गावांतील तरूणांना नोक-या देण्याचे मान्य केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या ३० वर्षात कंपनीने एकाही तरूणाला नोकरी अथवा रोजगार उपलब्ध करून दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर ग्रामपंचायतीची फसवणूक केल्याप्रकरणी उक्त कंपनीविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

सिरोप्लास्ट कंपनीने सिकॉम कडून दिनांक ०९/१२/१९८६ रोजी भाडे तत्वावर (लिजवर) जागा घेतली आहे. ग्रामपंचायतीमार्फत स्थानिक बेरोजगारांना कंपनीमध्ये रोजगारासाठी प्राधान्य देण्याची मागणी आली. सदर मागणीची पुर्तता कंपनी व्यवस्थापनाने केली आहे.

(२) हे खरे नाही.

कंपनी व्यवस्थापनाने १०० टक्के कामगार भरती ही ग्रुपग्रामपंचायत साले मध्ये समाविष्ट असलेली गावे तसेच आजुबाजूच्या खेड्या पाड्यातील बेरोजगार व होतकरु तरुणांना त्यांच्या योग्यतेनुसार रोजगाराची संधी दिली आहे.

(३) नाही.

वर (२) मध्ये नमूद केल्यानूसार कंपनीने कार्यवाही केली असल्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पारध धरणासाठी (ता.भोकरदन, जि.जालना) जमीन संपादित केलेल्या शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत**

**(४३) * १३५२८ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारध धरणासाठी (ता.भोकरदन, जि.जालना) ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत त्यांना मोबदला देण्याचे मा.उच्च न्यायालयाचे आदेश असतानाही मोबदला देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोबदला देण्यास विलंब केल्या प्रकरणी संबंधीत अधिकारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला देणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे, मासरुळ लघु पाटबंधारे प्रकल्प ता.जि.बुलडाणा या प्रकल्पासाठी मौजे पारध बु.ता.भोकरदन, जि.जालना येथील ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या त्यांना विशेष भुसंपादन अधिकारी जायकवाडी प्रकल्प (ला.क्षे.) जालना यांचेमार्फत दि.२५/७/१९९४ च्या निवाड्यानुसार भुसंपादन प्रकरण क्र.सी.आर.२/९० या प्रकरणी मोबदला देण्यात आला आहे. तथापि, संबंधित शेतकऱ्यांनी जमिनीचा मोबदला वाढवून मिळावा यासाठी निवाड्याच्या विरोधात कलम १८ खाली जिल्हा

न्यायालय जालना येथे दावे दाखल केले होते, जिल्हा न्यायालयाच्या निकालाविरोधात संबंधित कास्तकारांनी अपील दाखल केले. जिल्हा न्यायालयाचे निकालानुसार न्यायालयाच्या निकालाच्या दिनांकापासून वाढीव मोबदला मिळेपर्यंतच्या तारखेपर्यंत ९ टक्के व्याज देण्याबाबत आदेश देण्यात आले होते. ही बाब कास्तकारांना अमान्य असल्यामुळे संबंधित कास्तकारानी अपील क्र.१३१०/१२, १३११/१२, १३१२/१२, १३१३/१२, १३१४/१२, १३१५/१२ अन्वये उच्च न्यायालय औरंगाबाद येथे अपील दाखल केल्या होत्या. या अपील प्रकरणी उच्च न्यायालयाने विशेष भुसंपादन अधिकारी, जायकवाडी प्रकल्प (ला.क्षे.) जालना यांच्या निवाडा दिनांक पासून मोबदला मिळेपर्यंत प्रथम वर्षाला ९ टक्के व त्यानंतरच्या कालावधी साठी १५ टक्के व्याज मंजूर केलेले आहे.

तसेच, वर नमुद कास्तकारांचे अपीलांचे अनुषंगाने उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महसुल विभागाकडून (जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्याकडून) सुधारीत निवाडा व त्यानुसार निधी मागणी प्राप्त होताच निधी उपलब्ध करुन देण्यासाठी महामंडळाकडे निधी मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात येईल व मात्र कास्तकारांच्या मुळ भुसंदर्भातील जिल्हा न्यायालयाच्या निकालाच्या विरोधात उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात वि.पा.वि.महामंडळ, नागपूर यांच्यावतीने ५ अपील दाखल केल्या असून त्या प्रलंबित आहेत. त्यामुळे आवश्यक त्या निधीचा दाखल अपीलांचे अनुषंगाने उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार निधीचा भरणा करण्यात येईल.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महसुल विभागाकडून (जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्याकडून) सुधारीत निवाडा व त्यानुसार निधी मागणी प्राप्त होताच निधी उपलब्ध करुन देण्यासाठी महामंडळाकडे निधी मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात येईल व आवश्यक तो निधीचा भरणा करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माजगांव ग्रामपंचायत हद्दीतील (ता.खालापूर, जि.रायगड) पौद गावाजवळील कॉन्फिडन्स पेट्रोलिअम इंडिया लि.कंपनी यांनी वनौषधी वृक्षांची तोड केल्याबाबत

**(४४) * १३६८३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजगांव ग्रामपंचायत हद्दीतील (ता.खालापूर, जि.रायगड) पौद गावाजवळील कॉन्फिडन्स पेट्रोलिअम इंडिया लि. कंपनी यांनी कोणतीही परवानगी न घेता नियमांचे उल्लंघन करुन ३१ वेगवेगळ्या वनौषधी वृक्षांची तोड केल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपनी व्यवस्थापनाने १५ सप्टेंबर, २०१५ पूर्वी संरक्षक भिंत बांधून साग, खैरा, सावर, शेमट, भोकर, बोर, पळस, चेरा, किनई इ. ३१ वनौषधी वृक्षांची तोड करून शासनाची दिशाभूल करून वन विभागाचे अधिकारी तपासणीसाठी गेले असता त्यांना सुरक्षा रक्षकांनी तपासणी करण्यास थांबविले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

खालापूर तालुक्यातील माजगाव ग्रामपंचायत हद्दीतील पौदा गावाजवळील कॉन्स्फिडन्स पेट्रोलियम इंडिया लि. कंपनीच्या व्यवस्थापनाने मालकी स.नं.२७ मधील विनापरवानगीने एकूण ३१ वृक्षांची तोड केली असून यापैकी ५ वृक्ष (अनुसूचित वृक्षामधील साग व खैर वृक्ष संख्या-५) व २६ वृक्ष आडजात (बिगर अनुसूचित) आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) सदरहू कंपनीने महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम, १९६४ चा भंग केला असल्याने त्यांचेकडून कलम ४ नुसार प्रति झाड रु.५००/- प्रमाणे अनुसूचित ५ झाडांसाठी एकूण रुपये २५००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. सदर झाडांच्या बुंध्यावरील माल जप्त करुन विक्री आगार, साजगाव येथे ठेवण्यात आला आहे.

उर्वरीत २६ बिगर अनुसूचित झाडे तोडल्याबाबत महाराष्ट्र महसूल अधिनियम, १९६६ आणि महाराष्ट्र जमीन महसूल झाडे अधिनियम १९६७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत तहसीलदार, खालापूर यांना दिनांक २३.११.२०१५ रोजी कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर जिल्हयातील कुपोषणाबाबत**

**(४५) * १३७४८ श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुपोषित बालकांसाठी पुरवठा करण्यात येत असलेला सकस आहार लाभार्थ्यांपर्यंत पोहचत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्हयात प्रत्येक पंचायत समितीत ४० कुपोषित बालके आढळून आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागात कृषी साहित्य खरेदी व वाटपातही गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) माहे सप्टेंबर, २०१५ च्या मासिक प्रगती अहवालानुसार नागपूर जिल्हयातील कुपोषणाची प्रकल्पनिहाय आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| प्रकल्पांचे नाव | मध्यम तीव्र कुपोषित बालके (MAM) | अति तीव्र कुपोषित बालके (SAM) |
|---|---|---|
| रामटेक | २५ | ९ |
| काटोल | ३० | २ |
| कळमेश्वर | ३३ | ६ |

| | | |
|---|---|---|
| सावनेर | ५९ | ६ |
| भिवापूर | ७ | २ |
| पारशिवणी | ४२ | ८ |
| नरखेड | १० | ५ |
| कुही | १२ | १ |
| उमरेड | १८ | ३ |
| हिंगणा | ३४ | ११ |
| नागपूर | ४२ | ५ |
| मौदा | ८ | ४ |
| कामठी | ४३ | १२ |

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथे निरीक्षणगृहाची (रिमांड होमची) व्यवस्था उपलब्ध नसल्याबाबत**

**(४६) * १४०१८ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरासह जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी व या गुन्हेगारीत अटक करण्यात आलेल्या अल्पवयीन मुलींना ठेवण्यासाठी निरीक्षण गृहात व्यवस्था उपलब्ध नसल्याने अशा अल्पवयीन आरोपी मुलींना अमरावतीच्या निरीक्षण गृहात पाठवावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा अल्पवयीन आरोपी मुलींच्या चौकशीसाठी व गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी पोलीसांना वारंवार नागपूर ते अमरावती असा प्रवास करावा लागतो व त्यात बराच वेळ वाया जाऊन आर्थिक खर्चसुध्दा करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर येथे अल्पवयीन आरोपी मुलींकरिता निरीक्षण गृहाची व्यवस्था करणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) नागपूर जिल्ह्यात मुलींसाठी नवीन निरीक्षण गृहाबाबत आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांचेकडून प्राप्त प्रस्तावाबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे डोंगरकडा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील ग्रामपंचायत कार्यालयातील गैरव्यवहार**

**(४७) * १४२३४ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डोंगरकडा (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील ग्रामपंचायत मधील प्रपत्र नमुना क्र.८ मध्ये ग्रामपंचायत कार्यालयातील काही लोकांनी खाडाखोड करुन सुमारे १५० घरे स्वत:च्या नावावर करुन गैरव्यवहार केल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी डोंगरकडा ग्रामस्थांनी तसेच मा.सभापती, पंचायत समिती, कळमनुरी यांनी तत्पुर्वीच दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी व जिल्हाधिकारी, हिंगोली तसेच मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे स्वतंत्ररित्या निवेदन सादर करुन या गैरव्यवहार प्रकरणी दोषींविरुध्द कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्‌नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

सन १९९३-९४ च्या प्रपत्र नमुना क्र.-८ मध्ये खाडाखोड झाल्याचे अधिलेख्यावरुन आढळून आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशान्वये सदरच्या प्रपत्र नमुना क्र. ८ मधील अभिलेख्यातील चुकीच्या नोंदीची दुरुस्ती करण्यात आली होती. सध्या वापरात असलेल्या नमुना क्र. ८ मधील अभिलेख्यामध्ये खाडाखोड आढळून आली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, सदर प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीत सन १९९३-९४ च्या नमुना नं.८ अभिलेख्यामध्ये खाडाखोड केल्याचे आढळून आले. या प्रकरणी तत्कालीन ग्रामसेवक श्री.आर.एल.आडे यांना निलंबीत करण्यात आले होते. तसेच सन २००६-०७ च्या अभिलेख्यातील नोंदीमध्ये अनधिकृतपणे फेरबदल केल्याचे प्रथम दर्शन निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी एक महिन्याचे आत वस्तुनिष्ठ बाबींची सखोल चौकशी करुन दोषींविरुध्द नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व इंदिरा गांधी आवास योजनांची कामे बंद पडल्याबाबत

**(४८) * ११९९४ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व इंदिरा गांधी आवास योजनेचे राज्यातील ३५० पंचायत समित्यांमधील १ हजार ४०० लेखा अधिका-यांनी काम करण्यास नकार दिल्याने उक्त योजनांची कामे बंद पडली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचायत समिती गटस्तरावर नियमित करणे, अतिरिक्त काम वाढल्याने नवीन पदे पुन्हा निर्माण करणे, सदरील योजनेसाठी सहायक लेखा अधिकारी हे पद कंत्राटी पद्धतीने भरावे तसेच कर्मचा-यांवरील अन्याय दूर करावा अशी संघटनेची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२), (३) व (४) दिनांक ८/१०/२०१५ व दिनांक २६/०८/२०१५ रोजी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लेखा कर्मचारी संघटनेच्या मागण्यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

----------------

**राज्यात ६०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या नवीन प्रकल्पावरील बंदी उठवण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(४९) * ११८४३ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक ७५०२ ला दिनांक २८ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील १८.३३ टी.एम.सी. पाणी वापराच्या बृहत आराखड्यातील ६०० हे.सिंचन क्षमतेच्या प्रकल्पांवरील बंदी उठवून मान्यता देण्याची विनंती तत्कालीन मंत्री मंडळाने दिनांक ५ ऑगस्ट, २०१४ रोजी मा.राज्यपाल यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यातील सततचा दुष्काळ आणि टंचाई परिस्थिती निवारणार्थ आंध्र प्रदेशात वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, मा.राज्यपाल महोदयांकडून विशेष बाब म्हणून मध्य गोदावरी खो-यातील १८.३३ टी.एम.सी. पाण्याच्या बृहत आराखड्यातील प्रस्तावित प्रकल्पांना मान्यता मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने मा.राज्यपाल महोदयांकडे या बाबतचा प्रस्ताव सादर केला असल्यास त्याचा तपशिल काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे. मा.मुख्यमंत्री महोदयांनी दि. ५ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या पत्रान्वये मा.राज्यपाल महोदयांना विनंती केली आहे.

(२), (३) व (४) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने १८.३३ अ.घ.फू. पाणी वापराचे नियोजन केले आहे. त्यास शासनाने तत्वत: मान्यता दिली आहे. यापैकी रु.५३७.३७ कोटी किंमतीचे व ८६९६ हेक्टर सिंचन क्षमतेचे २६ प्रकल्प हाती घेणेस मान्यता देणेबाबत मा.राज्यपाल महोदय यांना दिनांक ५ ऑगस्ट, २०१४ च्या पत्राने विनंती करण्यात आली आहे. मान्यता प्रतिक्षाधीन आहे. दरम्यान बृहत आरखड्यातील २५० हेक्टर क्षमतेपेक्षा कमी सिंचन क्षमतेच्या योजना जलसंधारण कार्यक्रमात समाविष्ट करण्यास जलसंधारण विभागास कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------------

**पांढरकवडा (जि. यवतमाळ) येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये कार्यरत असलेले कनिष्ठ लिपिकाने केलेला गैरव्यवहार**

**(५०) * ११६९४ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि. यवतमाळ) येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये कार्यरत असताना लाखो रुपयांची बनावट देयके लावून शासनाच्या निधीमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या कनिष्ठ लिपीकास आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी अभय देत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गैरव्यवहार करणारा लिपिक व त्याला अभय देणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही, पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये कार्यरत असतांना कनिष्ठ लिपिकाने गैरव्यवहार केल्या प्रकरणी त्यास निलंबित करुन विभागीय चौकशी सुरु करण्यात आली असल्याने वरिष्ठ अधिकारी अभय देत नाहीत.

(२) अशा आशयाची तक्रार उप संचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ यांचेकडे दिनांक २०/८/२०१३ रोजी प्राप्त झालेली आहे.

(३) व (४) उपजिल्हा रुग्णालय, पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील सन २०११-१२, सन २०१२-१३ आणि २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे विशेष लेखापरिक्षण केले असता, गंभीर स्वरुपाच्या आर्थिक अनियमितता आढळून आलेल्या आहेत. त्यानुसार उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला यांनी संबंधीत कनिष्ठ लिपिकास दिनांक १०/१/२०१४ रोजी निलंबित करुन विभागीय चौकशी सुरु केली आहे.

-----------------

**सोलापूर जिल्हयातील नीरा उजवा कालव्याखालील बागायती क्षेत्र पाण्याअभावी नष्ट झाल्याबाबत**

**(५१) * ११३७८ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील जलसंपदा खात्याच्या अधिका-यांच्या चुकीच्या नियोजनामुळे नीरा उजवा कालव्याखालील पश्चिम माळशिरस तालुक्यातील बागायती क्षेत्र पाण्याअभावी नष्ट झाली असून तालुक्यातील २२ फाटे पूर्णपणे कोरडे झाल्याने ५० टक्के गावांचे नुकसान होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जलसंपदा खात्याच्या अधिका-यांची चौकशी करुन त्यांचेवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**घोडाझरी तलावाचा (ता.नागभीड, जि.चंद्रपूर) नवरगांव-गडबोरी कालवा फुटल्यामुळे शेतक-यांचे नुकसान झाल्याबाबत**

**(५२) * ११०८८ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडाझरी तलावाचा (ता.नागभीड, जि.चंद्रपूर) नवरगांव-गडबोरी मार्ग जाणाऱ्या कालव्याचे बांधकाम निकृष्ट झाल्याने कालवा फुटल्यामुळे नवरगांव, वानेरी, टेकरी, कन्हाळगांव, नांदेळ या परिसरातील शेतक-यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिनांक ३ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय व संबंधीत शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक २.१०.२०१५ रोजी साखळी क्रमांक १३८५० ला मुख्य कालवा फुटून जवळपास ०.४० हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे.

(२) नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हडपसर (जि.पुणे) परिसरातील पाटबंधारे विभागाच्या तसेच शासकीय गायरान जमिनीवर अतिक्रमण होत असल्याबाबत**

**(५३) * १२३६३ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील हडपसर परिसरात दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात नागरिकीकरण होत असून त्यासाठी अनेक बांधकाम व्यावसायिकांकडून पाटबंधारे विभागाच्या तसेच सरकारी गायरान जमिनीवर अतिक्रमण केले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मांजरी बुद्रुक साडेसतरानळी व फुरसुंगी हद्दीतील सरकारी गायरान जमिनीवर मोठ्या प्रमाणात बेकायदेशीररित्या बांधकामे सुरू आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन संबंधित अतिक्रमणे थांबविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे

जलसंपदा विभागाकडील जमिनीवर काही ठिकाणी बांधकाम व्यावसायिकांकडून अतिक्रमण झालेले आहे.

(२) मांजरी बुद्रुक साडेसतरानळी व फुरसुंगी येथील सरकारी गायरान जमिनीवर बांधकाम व्यावसायिकांचे अतिक्रमण झाल्याचे दिसून येत नाही, तथापि, सदर सरकारी गायरान जमिनींवर पूर्वी पासूनची काही अतिक्रमणे असल्याचे अतिक्रमण नोंदवहीवरुन दिसून येते.
(३) जलसंपदा विभागाशी संबंधीत जमिनीवर बांधकाम व्यावसायिकांकडून झालेल्या अतिक्रमणाबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयातील कृषी विभागाच्या गैरव्यवहाराबाबत

**(५४) * ११७८८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील कृषी विभागामार्फत करण्यात आलेल्या मृदसंधारण, जलसंधारण, पाणलोट व इतर कामात कोट्यवधी रुपयांचा गैरप्रकार करणाऱ्या सर्व यंत्रणांची राज्यस्तरावरील विशेष भरारी पथकामार्फत चौकशी करुन कारवाई करण्यात यावी अशी मागणी मराठवाडा जनता विकास परिषदेच्यावतीने कृषी आयुक्त, पुणे यांच्याकडे करण्यात आली आहे काय,
(२) असल्यास, कृषी आयुक्त, कृषी विभाग यांच्या स्तरावरील विशेष भरारी पथकाद्वारे मागील तीन वर्षातील सर्व कामाची प्रत्यक्ष चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले तसेच दोषी स्थानिक अधिकारी, कंत्राटदार, समित्या यांच्या संगनमताने केवळ कागदोपत्रीच करण्यात आलेल्या कोट्यावधी रुपयांच्या गैरप्रकारावरुन त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२), (३) व (४) सदर तक्रार कृषी आयुक्तालयातील मृदसंधारण विभागास दिनांक १८.११.२०१५ रोजी प्राप्त झाली आहे. त्यानुसार दक्षता पथकामार्फत चौकशी होणेसाठी आस्थापना विभाग कृषी आयुक्तालय पुणे यांना कळविण्यात आले आहे.

-------------------------------

## राज्यात मनोधैर्य योजना राबविण्यासाठी निधी मंजूर करण्याबाबत

**(५५) * ११५३७ श्रीमती दिप्ती चवधरी, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या महिला व बालकांना तात्काळ आर्थिक सहाय्य करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मनोधैर्य योजना निधीअभावी प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील दोन वर्षात तब्बल ९६६ पिडीत महिला व बालकांना आर्थिक मदत मंजूर होऊनही देण्यात आली नसून सध्या ५० कोटीची निधीची आवश्यकता असतांना यंदाच्या अर्थसंकल्पात केवळ ८ कोटी ९९ लाख रुपये मंजूर करण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे पिडीत महिला व बालकांना आर्थिक मदतीविना वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) चालू वित्तीय वर्षात मुळ अर्थसंकल्पीय रु. ८,९९,८९,०००/- तरतूदी व्यतिरीक्त पुरवणी मागणीद्वारे आणखीन रु. १२,८८,९६,०००/- इतका निधी मंजूर करण्यात आल्यामुळे माहे नोव्हेंबर २०१५ मध्ये संबधित लाभार्थ्यांना अर्थसहाय्य अदा करण्यात आलेले आहे.

(३) नाही.

(४) सदर योजनेसाठी सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात मुळ तरतूद व पुरवणी मागणी अन्वये एकंदरीत रुपये २१,८८,८५,०००/- इतकी तरतूद करण्यात आली असून या व्यतिरिक्त जिल्हयांच्या मागणीनुसार रुपये ३०,९५,२५,०००/- इतका निधी पुर्नविनियोजनान्वये उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---------------------------------

**अंभई (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) येथील गाव नदीवरील कोल्हापुरी बंधाऱ्याला दरवाजा बसविण्याबाबत**

**(५६) * १३३५० श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंभई (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) येथील गाव नदीवरील कोल्हापुरी बंधाऱ्याला ५ वर्षापासून गेट नसल्याने पाणी वाहून जात आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंभई ग्रामस्थ गत ५ वर्षापासून जिल्हा परिषद, औरंगाबादकडे गेट बसवणेसाठी पाठपुरावा करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदने त्यावर कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) पूर्ण झालेल्या विविध लघु सिंचन योजनांच्या विविध स्वरुपाच्या कामांच्या परिरक्षण व दुरुस्ती बाबत अवलंबवयाच्या कार्यपध्दतीबाबत तपशीलवार सुचना या शासनाने दिनांक २० नोव्हेंबर २०१३ रोजीच्या परिपत्रकाअन्वये निर्गमित केलेल्या असून त्या नुसार सदर प्रस्तावाबाबत तपासणी करुन नियमित प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना कळविण्यात आलेले आहे.

-----------------

**राज्यात विशेषत: चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात कुपोषणामुळे होणारे मृत्यू**

**(५७) * १२२९१ श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालकल्याण विभागाकडून विविध योजना राबवूनही राज्यात विशेषत: चंद्रपूर जिल्ह्यात माहे मे, २०१४ ते माहे जून, २०१५ या कालावधीत १ ते ६ वयोगटातील ५९६ बालकांचा व २५ मातांचा तसेच गडचिरोली जिल्ह्यात

० ते १ वयोगटातील ६५६ बालकांचा मृत्यू झाल्याचे व ठाणे जिल्ह्यात ऑगस्ट, २०१४ पासून जून, २०१५ पर्यंत ० ते ६ वर्षे गटातील २१५ मुलांचा तर ० ते १ वयोगातील १५९ अर्भकांचा मृत्यू झाल्याचे दिनांक ७ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालमृत्यू, उपजतमृत्यू आणि मातामृत्यूची आकडेवारी पाहता शासनाने विविध योजनांवर करोडो रुपये खर्च करुनही या योजनांची योग्यप्रकारे अंमलबजावणी न झाल्याने सदर योजना निष्प्रभ झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच बालमृत्यूच्या कारणांचा शोध घेवून त्या रोखण्यासाठी डॉ.अभय बंग यांनी सर्व्हेक्षण करुन ६ वर्षापूर्वी शासनास अहवाल सादर केला असून त्या अहवालातील उपायायोजनांसाठी शिफारशींची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये माहे मे, २०१४ ते माहे जून, २०१५ या कालावधीत ० ते ५ वर्ष वयोगटातील ६३९ बालकांचा व १५ मातांचा मृत्यू झालेला आहे. गडचिरोली जिल्ह्यात सन २०१४-२०१५ या वर्षामध्ये ६५६ अर्भक मृत्यू झालेले आहेत. ठाणे जिल्ह्यात ऑगस्ट, २०१४ ते जून, २०१५ पर्यंत ० ते ६ वयोगटात २१२ मुलांचा व ० ते १ वयोगटात १६५ अर्भकांचा मृत्यू झालेला आहे.

(२) हे खरे नाही.

राज्यामध्ये अर्भकमृत्यू, बालमृत्यू, उपजतमृत्यू व मातामृत्यू कमी करण्यासाठी शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत.

मातामृत्यू कमी करण्याच्या अनुषंगाने शासनामार्फत प्रामुख्याने खालील योजना राबविण्यात येत आहेत.

- गर्भवती मातांची १२ आठवड्याचे आत नोंदणी धनुर्वात प्रतिबंधक लस, लोहयुक्त गोळ्या, नोंदणीसहीत ५ वेळा तपासणी इत्यादी सेवा देण्यात येतात.
- जननी सुरक्षा योजना.

- जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम.
- मातृत्व अनुदान योजना.
- मानव विकास कार्यक्रमांतर्गत स्त्रीरोग तज्ञ व बालरोग तज्ञांच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात येतात.

बाल मृत्यू कमी करण्याच्या अनुषंगाने शासनामार्फत खालील योजना राबविण्यात येत आहेत.

- नवजात शिशु विशेष काळजी कक्ष (SNCU)
- पोषण पूनर्वसन केंद्र
- एच.बी.एन.सी.
- जंतनाशक व जीवनसत्व “अ” मोहिम.
- नियमित लसीकरण कार्यक्रम.
- अर्भक व नवजात बालकांच्या स्तनपानाबाबत जनजागृती.
- राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम.

(३) हे खरे नाही.

डॉ.अभय बंग समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शेतक-यांना शाश्वत सिंचन उपलब्ध होण्यासाठी**
**विहीरी आणि शेततळी निर्माण करण्याबाबत**

**(५८) * १२५२२ श्री.रामराव वडकुते, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.राजेंद्र जैन, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आत्महत्याग्रस्त भागातील तसेच सिंचनाची सुविधा नसलेल्या भागातील शेतक-यांना शेतीस शाश्वत सिंचन व्हावे यासाठी १ लाख विहीरी आणि ५० हजार शेततळी निर्माण करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप काय आहे तसेच या योजनेची अंमलबजावणी सुरु झाली आहे काय,

(३) असल्यास, सदर सिंचन विहिरी बांधण्याच्या प्रकल्पाला आवश्यक निधी उपलब्ध करुन प्रकल्प लवकर पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, आतापर्यंत किती शेतक-यांच्या शेतात विहिरीची व शेततळ्यांची सदर कामे हाती घेण्यात आली आहेत,

(५) असल्यास, उक्त योजनेअंतर्गत किती लाभार्थीची निवड करण्यात आली आहे व किती शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात आली आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशन-२०१५ मध्ये विधानसभेत मा.मुख्यमंत्री महोदय यांनी पुढील तीन वर्षामध्ये एक लाख विहिरी व दरवर्षी पन्नास हजार याप्रमाणे दीड लाख शेततळी तयार करण्यात येणार असल्याची घोषणा केलेली आहे.

(२), (३), (४) व (५) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत दिनांक १७ डिसेंबर, २०१२ च्या शासन निर्णयानुसार सिंचन विहिरी घेण्यात येतात. त्यानुसार पात्र लाभार्थ्यास रु. ३ लक्ष / विहिर इतकी रक्कम अनुज्ञेय आहे. शासन परिपत्रक क्र.मग्रारो-२०१५/प्र.क्र.८३/मग्रारो-१, दिनांक ३१ जुलै, २०१५ अन्वये पुढील तीन वर्षामध्ये घ्यावयाच्या एक लाख विहिरींबाबतच्या नियोजनाचे विभागनिहाय उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

शासन परिपत्रक दिनांक ०७ मार्च, २०१५ नुसार योजनेच्या कार्यान्वयाचे सुलभीकरण करण्यात आले आहे.

सन २०१५-१६ या वर्षाकरिता ३०,००० विहिरी पूर्ण करण्याचे नियोजित असून सद्यस्थितीमध्ये २६,६१५ विहिरी पूर्ण झालेल्या आहेत.

शेततळी घेण्यासंदर्भातील धोरणाबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्री.गजानन दामोदर मोरखडे मु.चिखली, खु.पो.लांजुड, यांची नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(५९) * १२५८७ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.गजानन दामोदर मोरखडे रा.मु.चिखली खु. पो.लांजुड यांची शेती मौजे पारखेड शिवारात असुन त्यांच्या गट नं. १२६ आहे या शेतीच्या बाजुला सांडवा आहे. सांडव्याच्या जमिनीवर काही लोकांनी अतिक्रमण केले असल्यामुळे अर्जदाराचा शेतात येणे जाण्याचा रस्ता बंद झाला आहे अशा आशयाची तक्रार मा.महसुल मंत्री यांचेकडे दिनांक १३ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे यावर्षीच्या पेरणी पासून वंचित राहिल्यामुळे नुकसान भरपाई मिळावी अन्यथा आत्महत्येची परवानगी द्यावी असे निवेदन तहसिलदार खामगांव यांना तसेच, मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक ८ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन पाठवून आत्महत्येची परवानगी मागितली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शेतक-यांची अडचण दूर करण्याबाबत विलंब करणा-या निष्क्रीय अधिका-यांवर कारवाई करुन संबंधीत शेतक-यास योग्य न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

लांजुड लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या सांडव्यावर काही लोकांनी अतिक्रमण केले आहे, परंतु अशा आशयाची तक्रार मा.महसूल मंत्री यांच्या अभिलेखात आढळून आली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) लांजुड लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या सांडव्यात श्री.गणेश वासुदेव बोडखे रा.घाटपुरी यांनी अतिक्रमण केल्यामुळे, अतिक्रमण काढून घेण्याबाबत पाटबंधारे उपविभाग खामगांव अंतर्गत तांदुळवाडी शाखेमार्फत दि.१०/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये पोलीस स्टेशन, खामगांव ग्रामीण संबंधीतावर रितसर गुन्हा दाखल केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय कर्मचा-यांप्रमाणे अनुदानित शाळांमधील शिक्षकांना घर बांधणी अग्रिम लागू करण्याबाबत

**(६०) * १२४०३ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कर्मचा-यांप्रमाणे अनुदानित शाळांमधील शिक्षकांना घर बांधणी अग्रीम लागू करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाने शिक्षण विभागाकडून मागवला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(३) सदर प्रस्तावास वित्त विभागाने मान्यता दिली आहे काय,

(४) असल्यास, त्याचे स्वरुप काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, दिनांक २३.९.२०१५ रोजी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून या विभागाने प्रस्ताव मागविला आहे.

(२), (३) व (४) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून या विभागास अद्याप प्रस्ताव प्राप्त झाला नाही.

-----------------

## दहिसर व सफाळ्याच्या जंगलात सागवानच्या झाडांची झालेली तोड

**(६१) * १२७०८ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिसर व सफाळ्याच्या जंगलात वन कर्मचाऱ्यांच्या संगनमताने सागवानच्या झाडांची तोड होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर झाडे तोडण्यासाठी वन विभागाची परवानगी घेतली होती काय,

(३) वनविभागाची कोणतीही परवानगी नसताना झाडांची तोड करणाऱ्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) जानेवारी ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत सफाळा व दहिसर वन क्षेत्रामध्ये १५ सागवानाच्या वृक्षांची तोड झाली आहे. ही वृक्ष तोड वन कर्मचाऱ्यांच्या संगनमताने करण्यात आलेली नाही.

(२) सदरहू वृक्षतोड अवैधरित्या झालेली असून वन विभागाची परवानगी घेतलेली नाही.

(३) अवैध वृक्षतोड झालेल्या ठिकाणी आरोपी आढळून न आलेले बेवारस म्हणून १० वनगुन्हांची नोंद करण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणांमध्ये एकूण २.६०४ घ.मी. माल जप्त करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्हयातील जिल्हा नियोजन समित्यांवर अशासकीय सदस्यांच्या नेमणुका करणेबाबत**

**(६२) * १२६५८ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील जिल्हा नियोजन समितीसह ५२ समित्यांवर माहे जुलै, २०१५ अखेर नियुक्त्या करण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुणे जिल्हा नियोजन समितीसह अन्य ५२ समित्यांवर अशासकीय सदस्यांच्या नेमणुका करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय. हे खरे आहे.

(२) ते (४) जिल्हाधिकारी, पुणे यांनी कळविल्यानुसार जुलै, २०१५ नंतर आजपर्यंत पुणे जिल्हयात मा. पालकमंत्री, पुणे यांचेकडून ५२ समित्यांपैकी ४३ समित्यांवर नियुक्तीच्या शिफारशी प्राप्त झाल्या असून सदर ४३ समित्यांवर नियुक्तीबाबत प्राप्त शिफारशी पैकी ४२ समित्या गठीत झाल्या आहेत. उर्वरीत जिल्हा नियोजन समिती या समितीवर विशेष निमंत्रित सदस्यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील ग्रामसेवकांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(६३) * ११६०० श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील १२०७ ग्रामपंचायतीसाठी ८७६ ग्रामसेवकांची पदे मंजूर असून यामधील १९५ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदांमुळे एका ग्रामसेवकास दोन ते तीन गावांची कामे सांभाळावी लागत असल्याने वेळेवर अहवाल न मिळाल्याने वरीष्ठ पातळीवर ग्रामपंचायतींला मिळणारा निधी परत जात असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) कंत्राटी ग्रामसेवकांची रिक्त पदे सरळसेवा भरती प्रक्रीया २०१५ नुसार भरण्याबाबत जाहीरात देण्यात आलेली आहे. जाहिरातीनुसार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून एकूण रिक्त पदाच्या ७५% अशी एकूण १४४ पदे भरण्याची प्रक्रीया नोव्हेंबर, २०१५ मध्ये सुरु आहे.

-----------------

**केंद्र शासनाकडून राज्य शासनाला देण्यात येणाऱ्या कुपोषणग्रस्तांच्या निधीमध्ये कपात केल्याबाबत**

**(६४) * १११९३ श्री.राजेंद्र मुळक, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये कुपोषणामुळे होणा-या बालमृत्यूची संख्या कमी करण्यासाठी केंद्र शासनाकडून राज्याला देण्यात येणा-या निधीमध्ये गेल्यावर्षी ११ टक्क्यांनी कपात केली असून यंदा हा निधी पूर्णपणे बंद करण्याचे निर्देश केंद्र शासनाने दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी मिळावा यासाठी पुर्नप्रस्ताव देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाकडून हा निधी मिळावा यासाठी शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

तथापि वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक २८/१०/२०१५ च्या पत्रानुसार केंद्र पुरस्कृत योजनांमध्ये केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा किती राहणार आहे, याबाबतच्या सूचना प्राप्त झाल्या असून त्यानुसार केंद्र पुरस्कृत योजनांच्या हिश्यामध्ये बदल करण्यात आला आहे. त्यानुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचा (ICDS) केंद्र व राज्य हिस्सा अनुक्रमे ६०:४० एवढा निश्चित करण्यात आला आहे.

(२) व (३) १४ व्या वित्त आयोगाकडून राज्य शासनाला देण्यात येणारा अधिकचा निधी व त्याअनुषंगाने केंद्र पुरस्कृत योजनांच्या राज्य हिश्यात होणारी वाढ लक्षात घेता राज्याच्या साधन संपत्तीच्या उपलब्ध स्त्रोतातून एवढा निधी उपलब्ध होणे शक्य नाही. त्यामुळे योजनांच्या प्रचलित केंद्र : राज्य हिश्श्याच्या प्रमाणामध्ये बदल करण्यात येऊ नये, असे नियोजन विभागाने निती आयोगास यापूर्वीच कळविले होते. तथापि तरीदेखील केंद्र शासनाने केंद्र पुरस्कृत योजनांच्या हिश्यामध्ये वरीलप्रमाणे बदल केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(६५) * १३३८९ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात डॉक्टर व कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना तसेच पंढरीत येणाऱ्या भाविकांना वैद्यकीय सेवा मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयात ७ डॉक्टरांची रिक्त पदे तसेच आयसीयू कक्ष डॉक्टरांअभावी बंद असल्याने सुविधा मिळत नसल्याने रुग्णांना खाजगी रुग्णालयात जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत तेथील नागरिक व लोकप्रतिनिधींनी जिल्हा आरोग्य प्रशासन, सोलापूर तसेच शासनाकडे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

डॉक्टरांची सर्व पदे भरलेली असून गट-क व गट-ड च्या अनुक्रमे एकूण ५९ व १०० मंजूर पदांपैकी अनुक्रमे ११ व २९ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

आय.सी.यू. कक्ष सद्यस्थितीत कार्यरत आहे. कोणत्याही रुग्णास खाजगी रुग्णालयात संदर्भीत केलेले नाही.

(३) अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाल्याची दिसून आले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात वनरक्षक म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी पदोन्नतीचे नियमन करण्याबाबत**

**(६६) * १२२६४ श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वनरक्षक म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी पदोन्नतीचे नियमन व्यवस्थित नसल्याने यवतमाळ जिल्ह्यातील वनरक्षकाला ३३ वर्षे सेवा झाल्यानंतर व मृत्यूच्या दुसऱ्या दिवशी पदोन्नतीचे आदेश निघाल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

महसूल व वन विभाग, अधिसूचना, दिनांक १८.२.१९७६, दि. २९.१०.१९८७ व दि. ३०.०६.२०११ अन्वये, वन विभागातील वनरक्षक पदाचे सेवाप्रवेश नियम वेळोवेळी तयार करण्यात आले असून त्याप्रमाणे पदोन्नतीचे नियमन होते. दि. ३०.६.२०११ रोजीच्या अधिसूचनेतील नियम-७(१) नुसार वनरक्षक पदावर किमान ३ वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेल्या वृत्तस्तरीय वनरक्षकाच्या ज्येष्ठता यादीतील कर्मचाऱ्यामधून जेष्ठता अधिन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीची वनपाल या पदावर पदोन्नती करण्याची तरतूद आहे.

सदर प्रश्नामध्ये उल्लेखित यवतमाळ जिल्ह्यातील वनरक्षक श्री.वाय.आर.जोधळे यांची प्रथम नियुक्ती सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड येथे झाली असून ते दिनांक १८.०३.१९८६ ते दिनांक १५.०८.१९८७ पर्यंत सदर पदावर कार्यरत होते. तद्नंतर त्यांची बदली ठाणे वनवृत्तातील डहाणू वनविभागात झाली. सदर पदावर ते दिनांक १३.०४.१९८९ ते ०५.०५.१९९२ पर्यंत कार्यरत होते.

त्यानंतर विनंतीवरुन त्यांची बदली यवतमाळ वनवृत्तामध्ये झाली. सदर पदावर ते दिनांक ०८.०५.१९९२ पासून रुजू झाले. एखाद्या वनरक्षकाची विनंती वरुन एका वनवृत्तातून दुसऱ्या वनवृत्तात बदली झाल्यास त्यांची सेवा जेष्ठता संबंधित वनवृत्तात शुन्य जेष्ठतेवर होत असते. वनरक्षक ते वनपाल या पदावरील पदोन्नत्या त्याच वनवृत्तातील वनरक्षकांच्या एकत्रित जेष्ठतासुचीच्या आधारे केल्या जातात. त्यामुळे श्री.जोंधळे यांची यवतमाळ वनवृत्तात सेवाजेष्ठता दिनांक ०८.०५.१९९२ पासून ग्राह्य धरण्यात आली. त्यानुसार त्यांना जेष्ठतेनुसार दि. ०३.०८.२०१५ रोजीच्या आदेशान्वये वनरक्षक पदावरुन वनपाल पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

तथापि, सदर वनरक्षक यांना मधुमेह या आजारामुळे व अर्धांगवायूचा झटका आल्याने ते दिनांक ०१.०७.२०१५ पासून वैद्यकीय रजेवर होते. सदर रजेच्या कालावधीतच त्यांचे दिनांक ०८.०८.२०१५ रोजी निधन झाले. पदोन्नतीचे आदेश निर्गमित झालेवर ५ दिवसानंतर त्यांचे निधन झाले. त्यामुळे त्यांच्या निधनानंतर पदोन्नतीचे आदेश निर्गमित झाले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**चिखलभोसी (ता.कंधार, जि.नांदेड) येथे डेंग्यू सदृष्य रोगाची लागण झाल्याबाबत**

**(६७) * १३१५८ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलभोसी (ता.कंधार, जि.नांदेड) येथे डेंग्यू सदृष्य रोगाची लागण झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावात २८ ते ३० रुग्ण हे डेंग्यूसदृष्य आजाराने त्रस्त असून सदर साथ आटोक्यात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

चिखलभोसी ता.कंधार, जि.नांदेड येथे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये डेंग्यू सदृश्य २३ रुग्ण आढळले असुन त्यापैकी ७ रुग्णांना डेंग्युची लागण झाल्याचे आढळून आले आहे.

(२) डेंग्यू नियंत्रणासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या व येत आहेत.

- जलद ताप सर्वेक्षण.
- ताप रुग्णांचे रक्तनमूने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी.
- संशयित डेंग्यू रुग्णांचे रक्तजलनमूने विषाणू परिक्षणासाठी सेंटीनल सेंटर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड येथे तपासणीसाठी पाठविले जातात.
- डेंग्यू रुग्णांना लक्षणाधारीत उपचार.
- किटकशास्त्रीय सर्वेक्षण.
- जीवशास्त्रीय उपाययोजनेअंतर्गत डासोत्पत्ती स्थानात गप्पीमासे सोडणे.
- धूर फवारणी.
- पुरेसा औषधी साठा उपलब्ध.
- कोरडा दिवस पाळणे.
- जनतेस आरोग्य शिक्षण.
- मार्गदर्शनासाठी जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांच्या भेटी.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

------------------------

## ओझर्डे (ता.वाई, जि.सातारा) येथे एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत बांधण्यात आलेली अंगणवाडीची भिंत कोसळल्याबाबत

**(६८) * ११५०५ श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओझर्डे (ता.वाई, जि.सातारा) येथील सन २००९ मध्ये एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत बांधण्यात आलेली अंगणवाडीची भिंत निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे कोसळल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन ही अंगणवाडी बांधणाऱ्या ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

मौजे ओझर्डे, ता.वाई, जि.सातारा येथील अंगणवाडी केंद्र क्र.८ या अंगणवाडीच्या इमारतीमध्ये शौचालयाच्या लगतच्या भिंतींना भेगा पडल्या होत्या. एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय यांनी बांधकाम विभागास कळविल्यानंतर बांधकाम विभागाने संबंधित मक्तेदारांकडून माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये पश्चिम व दक्षिण बाजूला भेगा पडलेल्या दोन्ही भिंती उतरवून पुन्हा बांधकाम दुरुस्ती करुन घेतली आहे. सद्य:स्थितीत सदरची इमारत सुस्थितीत आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## फणसाड अभयारण्य मुरुड (जि.रायगड) येथे ९ घुसखोर संशयास्पदरित्या घुसल्याबाबत

**(६९) * १२१२० श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.राजेंद्र जैन, श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फणसाड अभयारण्य, मुरुड (जि.रायगड) येथे ९ घुसखोर संशयास्पदरित्या घुसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर संशयास्पद फणसाडच्या जंगलात घुसलेल्या व्यक्तीचा शोध घेऊन शासनाने त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) वन विभागातील कर्मचारी व पोलीस विभागाकडील कर्मचारी यांच्या संयुक्त पथकाद्वारे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये फणसाड अभयारण्याची तपासणी केली असता संशयास्पदरित्या एकही घुसखोर घुसल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमळनेर तालुक्यातील (जि.जळगांव) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(७०) * १४२५५ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर तालुक्यातील (जि.जळगांव) अमळनेर ते मारवड रस्ता तसेच मंगरूळ ते कावपिंप्री रस्ता पंतप्रधान ग्रामसडक योजने अंतर्गत तयार होत असून ही कामे निकृष्ट दर्जाची झालेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच योग्य प्रमाणात रेती सिमेंट वाळू यांचे मिश्रण वापरले जात नाही तसेच रस्ते सपाट न होता उंचवटे तयार होत असल्याची तक्रार स्थानिक ग्रामस्थ व विविध संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) गुणवत्ता विषयक तक्रार प्राप्त झाली हे खरे आहे.

(३) योजनेच्या निकषानुसार राज्य गुणवत्ता नियंत्रक यांचेकडून करण्यात आलेल्या चौकशीत सदर कामांना समाधानकारक परंतु काहीशी सुधारणा आवश्यक असल्याचा शेरा प्राप्त झालेला आहे. कामांतील त्रुटींची पुर्तता

करण्याबाबत संबंधित कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, जिल्हा जळगाव यांना सुचना दिलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**म्हारळ ग्रामपंचायतीमध्ये (ता.उल्हासनगर, जि.ठाणे) मुद्रांक शुल्कात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(७१) * १३०५४ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हारळ ग्रामपंचायतीमध्ये (ता.उल्हासनगर, जि.ठाणे) तीन वर्षापासून मिळणाऱ्या शासनाच्या मुद्रांक शुल्क अनुदानात सुमारे रूपये १ कोटी ७ लाखांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामपंचायतीची शासनाने चौकशी करुन येथील सरपंचासह ग्रामसेवकांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) याप्रकरणी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा) यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशीत तत्कालीन ग्रामसेवक, तत्कालीन सरपंच व ग्रामपंचायत सदस्य दोषी आढळून आले आहे.

त्यानुसार ग्रामसेवक यांना आदेश दिनांक ०६/१०/२०१५ अन्वेय निलंबित करण्यात आले आहे. तसेच तत्कालीन सरपंच व सदस्य यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ३९ (१) अन्वये पदावरुन काढून टाकण्याबाबत प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे दिनांक ०५/१२/२०१५ रोजी सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**संगमेश्वर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) मौजे गोतावाडी ते जि.प.मराठी शाळा ग्रामदेवता मंदीर या रस्त्याचे काम तातडीने करण्याबाबत**

**(७२) * १४११७ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) मौजे गोताडवाडी ते जि.प. मराठी शाळा ग्रामदेवता मंदीर हा रस्ता होण्यासाठी लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ संबधित मंत्री व संबधित विभागाकडे वारंवार मागणी करत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदाच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २६६८९०.०४ कि.मी. इतकी असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते त्यानुसार रत्नागिरी जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ८०८५.३५ कि.मी. इतकी आहे. रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमाअंतर्गत सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये या आर्थिक वर्षासाठी रत्नागिरी जिल्हापरिषदेस एकूण ३७.८२ लक्ष / तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१२-२०१३, सन २०१३-२०१४, सन २०१४-२०१५ मध्ये एकूण रु.७६३.५८ लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेला रुपये १७००.६३ लक्ष असा एकूण रुपये ६१९८.०३ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

प्रश्नांकित रस्त्याच्या लांबीत तीन रस्त्यांचा समावेश आहे. (१) करंबेळे गावची गोताडवाडी खंडागळेवाडी ते कनकाडी येरडेवाडी रस्ता ग्रामीण मार्ग क्र. २११ (२) मेघी कनकाडी वांझोळे बावनदी कासार कोळवण कोंड्ये निवधे कळकदरा रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.९२ (३) करंबळे गावची धावडेवाडी झोरेवाडी मिरगळवाडी ते इजिमा ९२ रस्ता ग्रामीण मार्ग क्र.२१२

उपरोक्त रस्त्यांवर एस.टी.वाहतुक सुरु असून सदर रस्त्यांच्या खराब लांबीतील रस्ते दुरुस्तीची कामे अर्थसंकल्पात/रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमातून उपलब्ध निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचे प्रयत्न राहतील.

-----------------

**नाशिक जिल्हा रुग्णालयात सातजणांचा स्वाईन प्ल्युने मृत्यू झाल्याबाबत**

**(७३) * १३१६४ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा रुग्णालयात सातजणांचा स्वाईन प्ल्युने मृत्यू झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील स्वाईन पल्युची साथ रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

ऑगस्ट, २०१५ मध्ये जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे सात रुग्णांचा स्वाईन फ्ल्युने मृत्यू झाला, यापैकी एक रुग्ण पंजाब राज्यातील होता तर अहमदनगर आणि नाशिक शहरातील प्रत्येकी एक रुग्ण होता. उर्वरित चार नाशिक जिल्ह्यातील होते.

(२) नाशिक सह राज्यात स्वाईन फ्ल्यू प्रतिबंध व नियंत्रणासाठी खालील उपाय योजना करण्यात येत आहेत.

- साथरोग नियंत्रणासाठी राज्यस्तरीय तांत्रिक समितीची स्थापना.
- फ्ल्यू सदृश्य रुगणांचे नियमित सर्वेक्षण.
- फ्ल्यू रुग्ण तपासणी आणि उपचारासाठी स्क्रिनिंग सेंटर आणि विलगीकरण कक्षाची स्थापना.
- राज्यात स्वाईन फ्ल्यू निदानासाठी चार शासकीय प्रयोगशाळांमध्ये मोफत सुविधा.
- उपचार आणि निदानासाठी खाजगी आरोग्य सेवेतील समन्वय.
- स्वाईन फ्ल्यू आजारावरील औषधांचा पुरेसा साठा.

- शासकीय तसेच खाजगी डॉक्टरांसाठी स्वाईन फ्ल्यू प्रतिबंध व नियंत्रण मार्गदर्शक सुचनांचे वितरण तसेच कार्यशाळांचे आयोजन
- गरोदर मातांकरिता ऐच्छिक आणि मोफत फ्ल्यू लसीकरण
- खाजगी रुग्णालयात व्हेंटीलेटरवर उपचार घेणाऱ्या गरीब रुग्णांच्या वैद्यकीय देयकाच्या प्रतिपूर्ती सुविधा
- स्वाईन फ्ल्यू प्रतिबंध व नियंत्रणासाठी जनतेचे आरोग्य शिक्षण

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मराठवाड्यातील उजनी, मुळा, जायकवाडी, कुकडी आदि धरणांमध्ये केवळ ७ टक्केच पाणीसाठी शिल्लक असल्याबाबत**

**(७४) * १३३१७ श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात सरासरीपेक्षा यावर्षीही पाऊस कमी पडल्याने उजनी, मुळा, जायकवाडी, कुकडी आदि धरणांमध्ये माहे ऑक्टोबर, २०१५ पर्यंत केवळ ७ टक्केच पाणीसाठी शिल्लक आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यातील जनतेला पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

यावर्षी मराठवाड्यात दि.१५/१०/२०१५ पर्यंत वार्षिक सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला आहे. तथापि, मराठवाडा प्रदेशात झालेल्या कमी पावसाचा उजनी, मुळा व कुकडी जलाशयातील पाणीसाठ्यावर परिणाम होत नाही.

दि.१५/१०/२०१५ रोजी उजनी प्रकल्पात प्रकल्पीय उपयुक्त पाणीसाठ्याचा १५%, मुळाधरणामध्ये ५२%, जायकवाडी प्रकल्पात ६% व कुकडी समूहामध्ये ४९.७७% पाणीसाठा शिल्लक होता.

(२) शासन निर्णय क्रमांक एस.सी.वाय-२०१५/प्र.क्र.२९०/म-७ दि.७ सप्टेंबर २०१५ मधील तरतुदीनुसार धरणातील पाणीसाठी पिण्याकरिता राखून ठेवण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले असून त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी आवश्यकतेनुसार पिण्यासाठी पाणी आरक्षित करुन ठेवले आहे. तसेच समन्यायी

पाणी वाटपाचे धोरण शासनाने स्विकारले असून त्यानुषंगाने आवश्यकतेनुसार नदी खाऱ्यांतर्गत ऊर्ध्व धरणातील पाणी निम्न धरणासाठी सोडण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बालमजूरांच्या प्रमाणात होणारी वाढ

**(७५) * १३४६५ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात युनिसेफच्या अहवालावरुन बालमजूरांचे प्रमाण सातत्याने वाढत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर मुला-मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) युनिसेफ महाराष्ट्र यांच्याकडून दिनांक ७.१२.२०१५ रोजी प्राप्त माहितीनुसार बाल मजुरांचे प्रमाण वाढत असल्याबाबत युनिसेफकडून कोणताही अहवाल प्रसिध्द करण्यात आलेला नाही. युनिसेफमार्फत बाल मजूर आकडेवारीसंदर्भात जनगणना अहवाल (census data) चा वापर केला जातो. त्यानुसारची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे.

सन २००१ - ७६४,०७५

सन २०११ - ७७४,८१५

(२) युनिसेफकडून अद्याप शासनास अहवाल सादर केला गेला नसल्याने प्रश्न उद्भवत नाही. तथापि, बालमजुरांच्या पुनर्वसनाबाबत महिला व बाल विकास विभागामार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यासाठी बाल कल्याण समिती स्थापन करण्यात आलेली आहे. विविध धोकादायक उद्योगातून कामगार विभाग व गृह विभाग यांचेमार्फत संयुक्त मोहिम राबवून बालकामगार मुक्त करण्यात येतो. अशा काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना बाल कल्याण समितीमार्फत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० अन्वये व महाराष्ट्र बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२ अंतर्गत असलेल्या तरतुदीनुसार स्थापन करण्यात आलेल्या बालगृहात दाखल केले जाते.

संस्थेत दाखल झालेल्या बालकांच्या पालकांशी पत्रव्यवहार करुन त्यांच्याशी संपर्क साधला जातो आणि जे पालक बालकांना ताब्यात घेण्यास तयार असतील त्यांना बाल कल्याण समितीच्या आदेशान्वये पालकांच्या ताब्यात देऊन त्यांचे पुनर्वसन केले जाते.

जे पालक बाल कामगारास ताब्यात घेण्यास तयार नाहीत अथवा बालकास सांभाळण्यास सक्षम नाहीत तसेच ज्या बाल कामगारांना पालकांच्या ताब्यात जावयाचे नाही अशा बाल कामगारांना महिला व बाल विकास विभागाकडील बालगृहात दाखल करण्यात येते. संस्थेत दाखल केल्यानंतर संस्थेमार्फत त्यांना अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, शिक्षण, प्रशिक्षण, वैद्यकीय उपचार, मनोरंजन, खेळ आणि समुपदेशन करुन त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्ह्यातील छत्री निजामपूर आदिवासी वाडी आणि वारंगी या दोन गावांना जोडणारे काळ नदीवरील साकवांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(७६) * १३४९८ श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील छत्री निजामपूर आदिवासी वाडी आणि वारंगी या दोन गावांना जोडणारे काळ नदीवरील साकव मोडल्याने पावसाळ्यात विद्यार्थ्यांना वारंगी येथील माध्यमिक शाळेतील शिक्षणासाठी मानवी साखळीच्या सहाय्याने ये जा करावी लागत असल्याचे माहे जुलै, २०१५ च्या तिस-या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर काळ नदीवरील साकवाची तातडीने दुरूस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

काळ नदीवरील सदर पूल हा सन २०१३ च्या अतिवृष्टीमध्ये क्षतीग्रस्त झाला आहे. त्यामुळे वारंगी ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना धरण संरेखेच्या वरील बाजूस अस्तित्वात असलेल्या निजामपूर- बावळे पादचारी पुलाचा वापर करावा लागत आहे. त्यामुळे १ ते १.५० कि.मी. चा वळसा पडत आहे.

(२) होय.

(३) सन २०१३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे आलेल्या पुरात सदरच्या लोखंडी पादचारी पुलाचे आठ गाळे पुर्णत: वाहून गेले असून इतर भागांनाही दुरुस्तीची आवश्यकता असल्याचे आढळून आले. सदरच्या लोखंडी पुलाचे दुरुस्तीऐवजी कायमस्वरुपी उपाययोजना करण्याचे दृष्टीने अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे. अंदाजपत्रक मान्यतेनंतर सदर पुलाचे काम करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) तालुक्यातील खारबंदिस्तीची निगा व दुरुस्तीसाठी निधी प्राप्त झालेल्या कामांना मंजूरी देण्याबाबत

**(७७)** * **१३७२५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील खारबंदिस्तीची निगा व दुरुस्तीसाठी रक्कम रु.१५ कोटी शासनाकडून मंजूर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उरण तालुक्यात किती कामांना मंजूरी देण्यात आली आहे,

(३) असल्यास, मंजूरी देण्यात आलेल्या कामांवर आतापर्यंत किती रक्कम खर्च करण्यात आली ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

सन २०१५-१६ साठी कोकणातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पाच जिल्हयांसाठी खारबंधीस्तीची देखरेख व दुरुस्तीसाठी रुपये ७.४२ कोटी इतका निधी मंजूर केला आहे. यापैकी रुपये ३.०० कोटी इतका निधी रायगड जिल्हयासाठी मंजूर आहे. देखभाल व दुरुस्तीसाठी प्राप्त होणारा निधी हा तालुकानिहाय वितरीत केला जात नसून जिल्हयातील भरती ओहोटी व पुरामुळे नुकसान झालेल्या व तातडीने हाती घ्यावयाच्या योजनांसाठी आवश्यकतेनुसार सदर निधीचा वापर केला जातो.

(२) उरण तालुक्यात एकूण ४ शासकीय खारभूमी योजना असून यापैकी खोपटा कोप्रोली, आवरे, बोरखार या ३ खारभूमी योजनांची कामे नाबार्डनिधी अंतर्गत प्रगतीपथावर असलेने या योजनांवर देखभाल व दुरुस्तीसाठी खर्च केला जात नाही. जुई धमकडी या खारभूमी योजनेच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामांना क्षेत्रियस्तरावर मंजुरी दिली आहे.

(३) जुई धमकडी या खारभूमी योजनेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी रुपये १२.०२ लक्ष इतका खर्च झाला आहे.

-----------------

**राज्यातील औषध निर्माता यांना निवडश्रेणी औषध निर्माता ही पदोन्नती देण्याबाबत**

**(७८) *१३७८३ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाने दिनांक २६ सप्टेंबर, १९७० च्या सेवा प्रवेश नियम निवडश्रेणी औषध निर्माता या शासन निर्णयाद्वारे सार्वजनिक आरोग्य विभागातील औषध निर्माता यांना निवडश्रेणी औषध निर्माता ही पदोन्नती अद्याप दिलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पदोन्नती संदर्भात हकीम समितीच्या शिफारशी औषध निर्माता अधिकारी संवर्गात लागू करण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औषध निर्माता यांना निवडश्रेणी औषध निर्माता ही पदोन्नती देण्याबाबत तसेच हकीम समितीच्या पदोन्नती संदर्भातील शिफारशी औषध निर्माण अधिकारी संवर्गात लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या आस्थापनेवर अराजपत्रित औषध निर्माता, वरिष्ठ औषध निर्माता, निवडश्रेणी औषध निर्माता व राजपत्रित औषध निर्माता ही पदे पूर्वीपासून अस्तित्वात आहेत. तथापि, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आस्थापनेवरील अराजपत्रित औषध निर्माता यांना वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या सेवाप्रवेश नियमानुसार वरिष्ठ पदावर पदोन्नती देता येत नाही.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

वेतनत्रुटी निवारण समितीच्या शिफारसीनुसार आरोग्य सेवा संचालनालयातील औषधनिर्माता या संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाहीत.

-----------------

## राज्यात जलविद्युत प्रकल्पाचे होत असलेले खाजगीकरण

**(७९) * ११९८० प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलविद्युत विभागाच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या ३४ प्रकल्पांपैकी येलदरी, वीर, कोयना, भारघर, वैतरणा आणि राधानगरी या ४३६ मेगावॅट सहा प्रकल्पांचे २५ वर्षांचे आयुष्य संपल्याने त्यांची दुरुस्ती व आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलविद्युत प्रकल्पाच्या दुरुस्ती व उभारणीसाठी केंद्र शासन रुपये १ कोटी अनुदान देते मात्र त्याचा लाभ न घेतल्याने व दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाल्याने सदर प्रकल्पाची वीजनिर्मिती क्षमता वर्षानुवर्षे स्थिर आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाची दुरुस्ती आवश्यक असतानाही ते खाजगी कंपन्याकडेच वीजनिर्मिती व दुरुस्तीसाठी देण्याच्या हालचाली सुरु आहेत व १० वर्षांपूर्वी डॉडसन लिंड ब्लॅम या अमेरिकन कंपनीने भंडारदरा (१) व (२) हे प्रकल्प ताब्यात घेतले असून आता वैतरणा प्रकल्पासाठी प्रयत्न सुरु केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने खाजगी कंपन्याना जलविद्युत प्रकल्प उभारण्याची परवानगी देण्याचे धोरण अवलंबल्याने त्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे व गेल्या ४ वर्षांत १०१ मेगावॅट क्षमतेचे खाजगी प्रकल्प उभे राहिले आहेत तसेच कोयना धरण पायथाकाळ व कुंभ (रायगड) या प्रकल्पांची कामेही ठप्प आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी करुन जलविद्युत प्रकल्पाचे होणारे खाजगीकरण थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

येलदरी (३ x ७.५ मे.वॅ.), वीर (२ x ४.५ मे.वॅ.), कोयना धरण पायथा (२ x २० मे.वॅ.), भाटघर (१ x ६० मे.वॅ.), कोयना स्तर-३ (४ x ८० मे.वॅ.), या ४६७.५० मे.वॅ. क्षमतेच्या सहा जलविद्युत प्रकल्पांचे नुतनीकरण व आधुनिकीकरण करावे असे मुख्य अभियंता (विद्युत), जलविद्युत प्रकल्प, मुंबई यांनी प्रस्तावित केले आहे.

(२) केंद्र शासन नवीन व पुनर्निर्माण ऊर्जा मंत्रालय, नवी दिल्ली (MNRE) यांच्याकडून एप्रिल, १४ ते मार्च १७ या कालावधीत २५ मे.वॅ. क्षमतेपर्यंतच्या लहान जलविद्‌युत प्रकल्पांच्या नुतनीकरण व आधुनिकीकरणासाठी रुपये १ कोटी प्रति मे.वॅट अनुदान निश्चित करण्यात आले आहे. नुतनीकरण व आधुनिकीकरण कामाचा प्रशासकीय मान्यता प्राप्त सविस्तर प्रकल्प अहवालासह प्रस्ताव केंद्र शासनास सादर केल्यानंतर अनुदान मिळते. राज्याचे जलविद्‌युत प्रकल्पाच्या नुतनीकरण व आधुनिकीकरणाचे धोरण ऊर्जा विभागाच्या मान्यतेचे निश्चित करणे व त्यानंतर जलविद्‌युत प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे ही कार्यवाही प्रगतीपथावर आहे. म.रा.वि.म./महाजनको यांचेकडून दरम्यानच्या काळात भिरा (२ x ४० मे.वॅ.), तिलारी (१ x ६० मे.वॅ.), कोयना टप्पा-१ व २ (४ x ७० मे.वॅ. व ४ x ८० मे.वॅ.), कोयना टप्पा-३ (४ x ८० मे.वॅ.), या जलविद्‌युत प्रकल्पांचे गरजेनुसार up gradation/modernization चे काम करण्यात आले आहे. त्यामुळे दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाले आहे, हे खरे नाही.

(३) वैतरणा प्रकल्पाच्या नुतनीकरणासाठी मे.डॉडसन यांचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. तथापि, जलविद्‌युत प्रकल्पांचे खाजगीकरणाच्या माध्यमातुन नुतनीकरण करण्याचे सध्या कोणतेही धोरण नाही.

(४) होय,

(५) व (६) सन २००२ ते २०१५ या काळात राज्यात खाजगीकरणातून १०१.१ मे.वॅट क्षमतेचे २४ लहान जलविद्‌युत प्रकल्प खाजगीकरणाच्या माध्यमातून उभारले आहेत. शासनाचे दिनांक १५.९.२००५ चे खाजगीकरणाच्या धोरणास चांगला प्रतिसाद मिळत आहे. या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज राज्याच्या विद्‌युत जाळ्यातच दिली जाते. खाजगीकरणाच्या या यशस्वी ठरलेल्या धोरणाचा फेरविचार करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिरसमार्ग बहाद्दरपूर (ता.गेवराई, जि.बीड) रस्त्यावरील पुलाचे बांधकाम करण्याबाबत

**(८०) * ११८३२ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिरसमार्ग (ता.गेवराई, जि.बीड) निम्नपातळी बंधारा प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येणा-या सिरसमार्ग बहाद्दरपूर रस्त्यावरील पुलाच्या बांधकामाबाबतचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता यांनी दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांच्याकडे मान्यतेस्तव सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी तातडीने कार्यवाही करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मुख्य अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बंधा-यातील पाण्याची पातळी लक्षात घेता सदर रस्त्यावरुन रहदारी बंद झाल्यामुळे सदर पुलाच्या बांधकामास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) उक्त उल्लेखीत बंधा-याच्या कामात अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार प्रलंबित असलेली इतर कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

संबंधित कार्यकारी अभियंता यांनी प्राथमिक पाहणीनुसार मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांना अहवाल सादर केलेला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सद्यस्थितीत बंधाऱ्यात अल्प पाणी साठा आहे. बहाद्दरपूर जवळून जात असलेल्या शिरसमार्ग ते दिमाखवाडी रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग बीड यांच्या २०००-२०२१ या २० वर्षीय रस्ते विकास योजनेअंतर्गत येत असल्याने या रस्त्यावर येणाऱ्या पूलाचे बांधकाम देखील सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करणे अपेक्षित आहे.

(४) बंधाऱ्याच्या उर्वरीत कामासाठी सन २०१५-१६ मध्ये ७.०० कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद आहे. तरतूदीप्रमाणे काम प्रगत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्ह्यात झालेला हत्तीरोगाचा प्रादुर्भाव दूर करण्याबाबत**

**(८१) * ११६९५ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात हत्तीरोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १६ ते ३१ ऑगस्ट, २०१४ दरम्यान राबविण्यात आलेल्या हत्तीरोग रुग्ण शोध मोहिम अहवालानुसार अंडवृध्दीचे २ हजार १५७ व हत्तीपायाचे ३ हजार ८४० असे एकूण ५,९९७ रुग्ण आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्ह्यात विशेष शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शिबीरात किती जणांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या, तसेच सदर हत्तीरोगाचा प्रादुर्भाव संपुष्टात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, नांदेड येथे दिनांक ८/९/२०१५ ते १५/१०/२०१५ या कालावधीत अंडवृध्दी शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

(४) सदर शिबिरात एकूण १६६ अंडवृध्दी रुग्णांवर यशस्वीपणे शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून हत्तीरोग दूरीकरणासाठी शासन स्तरावर खालील उपाययोजना राबविण्यात आल्या व येत आहेत.

- नांदेड जिल्ह्यात हत्तीरोग सर्वेक्षण पथक, हत्तीरोग नियंत्रण पथक व हत्तीरोग रात्र चिकित्सालय (पेठवडज व जलधारा) या अंतर्गत हत्तीरोग रुग्ण सर्वेक्षण व तपासणी तसेच दुषित आढळून आलेल्या रुग्णांना १२ दिवसाचा डी.ई.सी. गोळ्यांचा उपचार केला जातो.
- हत्तीरोग नियंत्रण पथकामार्फत अळीनाशक फवारणी केली जाते.
- किटक समांहारकामार्फत किटकशास्त्रीय सर्वेक्षण करण्यात येत.
- हत्तीपाय रुग्णांच्या बाधित अवयवांची देखभाल व निगा राखण्यासाठी रुग्णांना प्रशिक्षण दिले जाते.
- अंडवृध्दी रुग्णांची शस्त्रक्रिया करण्यासाठी जिल्हा रुग्णालयात शिबीरांचे आयोजन केले जाते.
- सन २००४ पासून संपूर्ण जिल्ह्यामध्ये हत्तीरोग दूरीकरणासाठी एक दिवसीय सार्वत्रिक औषधोपचार मोहिम राबविण्यात येते

दरवर्षी दिनांक १६ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत हत्तीरोग रुग्ण शोध मोहिम राबविण्यात येते.

हत्तीरोगाविषयी आरोग्य कर्मचारी व प्रसिध्दी माध्यमे यांचेमार्फत जनतेस आरोग्य शिक्षण देण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यातील एकरुख उपसा सिंचन योजना पूर्ण करण्याबाबत**

**(८२) * ११३८२ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यातील १७ हजार ३१० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी सन १९९६ साली एकरुख उपसा सिंचन योजना आखण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यःस्थितीत या योजनेचे काम अंतिम टप्प्यात आहे, या योजनेच्या पुर्णत्वासाठी सध्या निधी देखील प्राप्त झाला आहे, पण तो खर्च करण्यास शासनाची परवानगी नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकल्पास प्राप्त निधी खर्च करण्यास परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) व (३) नाही. योजनेवर अद्यावत किंमतीच्या सुमारे ३०% खर्च झालेला आहे. या योजने करिता सन २०१४-२०१५ मधील रुपये ५.७११२ कोटी व सन २०१५-२०१६ मधील रुपये ११.०० कोटी उपलब्ध अखर्चित निधी खर्च करणेस शासनाने दिनांक ८.१०.२०१५ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे उथळपेठ (ता.मूल, जि.चंद्रपूर) येथील महात्मा गांधी ग्रामीण रो.ह.यो. अंतर्गत पांदन रस्त्याच्या कामांत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(८३) * ११९०४ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उथळपेठ (ता.मूल, जि.चंद्रपूर) येथील महात्मा गांधी ग्रामीण रो.ह.यो.अंतर्गत पांदन रस्त्याच्या कामांत सन २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वर्षात बनावट मजूर दाखवून त्यांच्या नांवे पैशाची उचल केल्याचे दिनांक २१ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषी अधिका-यांवर व संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत:खरे आहे.

(२) या प्रकरणी पंचायत समिती स्तरावर चौकशी करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी अपहार झालेला नसून अनियमितता झालेली आहे. या अनियमिततेस ग्राम रोजगार सेवक दोषी असल्याचे चौकशीत आढळून आल्याने त्यांना कामावरुन कमी करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील कामगार विमा योजना रुग्णालयातील हंगामी डॉक्टरांना सेवेत कायम करण्याबाबत**

**(८४) * १३३७० श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने राज्यातील राज्य कामगार विमा योजनेच्या रुग्णालयात १५ ते २० वर्षे काम करणाऱ्या हंगामी जेष्ठ डॉक्टरांना सेवेत कायम करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवेत कायम करतांना त्यांना मुळ वेतनावर काम सुरु करण्याचे आदेश दिल्याने त्यांचा पगार रूपये ४५,०००/- ने कमी झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेवा सातत्य देताना मागील सेवाकाळ गृहीत धरुन सदर डॉक्टरांना वेतनीय लाभ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय. राज्य कामगार विमा योजनेतील अस्थाई स्वरुपात नियुक्त झालेल्या व दिनांक १.१.२०१४ रोजी ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या समावेशनाचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर अस्थाई वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र दिल्यावर समावेशन करण्यात येणार आहे.

(२) सदर अस्थाई वैद्यकीय अधिकाऱ्यांची वेतननिश्चिती त्यांच्या वेतनश्रेणीच्या प्रारंभिक मूळ वेतनावर करण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वडूर (जि.नांदेड) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत मजूरांचे वेतन देण्याबाबत**

**(८५) * १३४५० श्री.प्रकाश गजभिये, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडूर (जि.नांदेड) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची कामे सुरु असून सदर कामे करणाऱ्या मजुरांना त्यांचे वेतन दिले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर मजुरांचे थकित वेतन देणेबाबत तसेच थकित वेतन ठेवण्यास जबाबदार असणाऱ्या दोषींविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

प्रश्नात वडुर तालुका नमुद केला आहे. तथापि वडुर तालुका नसुन नांदेड जिल्ह्यात बिलोली तालुक्यात बडूर हे गाव आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**दापोली व रत्नागिरी (जि.रत्नागिरी) तालुक्यातील नादुरुस्त व मोडकळीस आलेल्या साकवांसाठी शासनाने निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(८६) * १२७०७ श्री.महादेव जानकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली व रत्नागिरी (जि.रत्नागिरी) तालुक्यातील संगलट, कोतवडे, नेवरे या गावातील साकव वाहतुकीसाठी धोकादायक झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्हयातील नादुरुस्त व मोडकळीस असलेल्या साकवांसाठी शासन निधी उपलब्ध करुन देणार आहे काय,

(३) असल्यास, सदर निधी केव्हापर्यंत उपलब्ध होणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे. तथापि, संगलट हे गाव दापोली तालुक्यात येत नसून खेड तालुक्यात आहे. खेड तालुक्यातील संगलट या गावाला कोणत्याही स्वरुपाचा साकव अस्तित्वात नाही.

कोतवडे कोलगेवाउी येथील साकव कोसळल्याने सदर जागी नवीन आर.सी.सी. फुटब्रीज बांधणेत आला आहे.

(२) व (३) सन २००२-०३ पूर्वी जिल्हा परिषदांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून साकव दुरुस्तीसाठी ३०५४ मार्ग पूल परिरक्षण व दुरुस्ती या योजनेत्तर संवर्गाखाली साकव दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध होत होता. परंतू तद्नंतर सन २००२-२००३ पासून संवर्ग अ ब क ड मध्ये साकव ही बाब अंतर्भूत होत नाही.

सन २०१२-१३ या वर्षापासून जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांची देखभाल दुरुस्ती हा योजनेत्तर कार्यक्रम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ग्राम विकास विभागाकडे हस्तातंरीत करण्यात आलेला आहे.

शासन निर्णय दि. १०.९.२०१२ अन्वये जिल्हा परिषदेमार्फत इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग या रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीकरीता निधीचे वाटप करण्याबाबत कार्यपध्दती विषद केली आहे. त्यानुसार या योजनेत्तर कार्यक्रमासाठी गट अ ब क ड तयार केले असून गट ड मधील अन्य व संकिर्ण कार्यक्रम अंतर्गत जिल्हा परिषदेने साकव दुरुस्तीचे काम करण्याचे नियोजन करणे अपेक्षित आहे.

संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसार रत्नागिरी जिल्हा परिषदेअंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ८०८५.३५ कि.मी. इतकी आहे. रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमाअंतर्गत सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेस एकूण रु. ३७३३.८२ लक्ष, तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये एकूण रुपये ७६३.५८ लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेला रुपये १७००.६३ लक्ष असा एकूण रुपये ६१९८.०३ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

---

**यवतमाळ जिल्हयाच्या सर्वांगिण विकासासाठी आराखडा तयार करण्याबाबत**

**(८७) * १२९२१ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयाच्या सर्वांगीण विकासासाठी नाविन्यपूर्ण बाबींच्या संकल्पनेचा आराखडा तयार करण्यासाठी जिल्हयातील नागरिकांना नवसंकल्पना सूचविण्याचे आवाहन करण्यात आले असून जिल्हास्तरीय नाविन्यता परिषदेची स्थापना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांच्या शिफारशी, सूचना जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाल्या आहेत काय,

(३) असल्यास, जिल्हयाच्या विकासाचा आराखडा तयार करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, या विकास आराखड्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्याअनुषंगाने यवतमाळ जिल्हयाच्या सर्वागीण विकासासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींचा आराखडा बनविण्यात सहभाग घेण्यात येणार आहे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२) होय. (एकूण १२ संकल्पना)

(३) प्राप्त झालेल्या संकल्पना / प्रस्तावाचा आराखडा तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) शासन निर्णय, क्र. जिनाप-२११४/ प्र.क्र.२/ २०१४/ १४७१, दिनांक १४.८.२०१४ नुसार जिल्हा नाविन्यता परिषदेची रुपरेषा, उद्दिष्टे, कार्ये, स्पष्ट करण्यात आली आहेत. त्यानुसार यवतमाळ जिल्याचा विकास आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) जिल्हा नाविन्यता परिषदेस आराखडा बनविण्याचे काम सोपविण्यात आलेले आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींकडून संकल्पना प्राप्त झाल्यास त्यावर जिल्हा नाविन्यता परिषद निश्चित विचार करेल.

-----------------

**बुटीबोरी (नागपूर) येथे राज्य कामगार विमा रुग्णालय उभारण्याबाबत**

**(८८) * १३०७४ श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील बुटीबोरीमध्ये राज्य कामगार विमा रुग्णालय सुरु करण्यासाठी निकष पूर्ण होणे शक्य नसल्याने सद्या तरी रुग्णालय उभारणे शक्य नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकष पूर्ण करुन बुटीबोरीमध्ये कामगार रुग्णालय सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

(२) बुटीबोरी नागपूर येथे राज्य कामगार विमा रुग्णालय उभारण्याची बाब केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालय यांच्या अधिपत्याखालील राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्या अखत्यारित आहे. एखाद्या क्षेत्रात विमाधारकांच्या संख्येचे निकष पुर्ण झाल्यावर व राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांनी मान्यता दिल्यानंतर त्या क्षेत्रात नवीन रुग्णालय उभारण्यात येते. सद्यस्थितीत बुटीबोरी येथे आवश्यक निकष पूर्ण करत नसून निकषाची पुर्तता झाल्यानंतर प्रस्ताव पाठविण्यात येईल. यासंबंधी राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्यामार्फत कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हातोला येथील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याच्या दुरुस्तीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(८९) * १२२८३ श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील सिंचनाकरीता वापरण्यात येणाऱ्या कोल्हापूरी बंधाऱ्याच्या दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली परंतु हातोला येथील कोल्हापूर बंधाऱ्याचे दुरुस्तीचे काम न करताच कंत्राटदार व अधिकाऱ्यांच्या संगनमताने पहिल्या टप्प्यात चार लाखाच्या कामाची उचल देण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कामे न करताच पहिल्या टप्प्यातील कामाचे पैसे ठेकेदारास देणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

विशेष दुरुस्तीचे काम न करता कंत्राटदाराला कोणतीही रक्कम अदा करण्यात आलेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मांडवी (जि.नांदेड) येथील ग्रामीण रुग्णालयात अधिक्षकासह चार वैद्यकीय अधिकारी नियुक्त असताना ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात एकही डॉक्टर रुग्णालयात नसल्याबाबत**

**(९०) * १३१६२ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांडवी (जि.नांदेड) येथील ग्रामीण रुग्णालयात अधिक्षकासह चार वैद्यकीय अधिकारी नियुक्त असताना एकही डॉक्टर रुग्णालयात नसल्याने ग्रामीण भागातून आलेल्या रुग्णाची गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) डॉक्टर रुग्णालयात हजर असल्याने चौकशीचा व कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अंगणवाडी सेविकांना सहावा वेतन लागू करण्याबाबत**

**(९१) * १३२१० श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सध्याची वाढती महागाई लक्षात घेऊन केंद्र सरकार सहावा वेतन आयोग लागू करण्याचा विचार करीत आहे. मात्र अंगणवाडी सेविकांकडे शासन दुर्लक्ष करीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे काय,

(२) असल्यास, शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच अंगणवाडी सेविकांनाही सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र शासनाची योजना असून ती राज्य शासनामार्फत राबविण्यात येत आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या मॅन्युअलप्रमाणे अंगणवाडी सेविका, मदतनीस ही पदे मानधनी स्वरुपाची असून त्यांच्या अंगणवाडीची कामकाजाची वेळ ही फक्त चार तास आहे. त्यामुळे त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे दर्जा देणे संयुक्तिक होणार नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्रमांक ४९५३-४९५७/१९९८ स्टेट ऑफ कर्नाटका विरुध्द अमिराबी आणि इतर याप्रकरणी दिनांक ०७/१२/२००६ रोजी अंगणवाडी सेविका, मदतनीस ही मानधनी पदे असून त्यांची पदे ही सिव्हिल पोस्ट नाहीत असा निर्णय दिलेला आहे.

अंगणवाडी सेविका, मदतनीस ही मानधनी पदे असल्यामुळे त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा नाही. त्यामुळे त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी, महागाई भत्ता, वार्षिक वेतनवाढ देता येणे शक्य नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गुहागर (जि.रत्नागिरी) ग्रामीण रुग्णालयात रुग्णसेवेसाठी बांधण्यात आलेल्या इमारतीचा ताबा मिळण्याबाबत**

**(९२) * १३८२० श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर (जि.रत्नागिरी) ग्रामीण रुग्णालयात रुग्णसेवेसाठी चार वर्षापूर्वी पूर्ण झालेल्या २० खाटांच्या दुमजली इमारतीचा ताबा रुग्णालयाकडे देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, त्यामुळे तेथील ग्रामीण भागातील रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) इमारतीचा ताबा रुग्णालयाकडे देण्यात आलेला नाही, हे खरे आहे.

(२), (३) व (४) विद्युत जोडणी व पाणी पुरवठ्याची अपूर्ण कामे लवकरच पूर्ण होऊन इमारत ताब्यात मिळणे अपेक्षित आहे. सध्या उपलब्ध इमारतीमध्ये रुग्णांना चांगली सेवा देण्यात येत आहे.

-----------------

**जव्हार, मोखाडा तालुक्यातील (जि.पालघर) अनेक गावांत रोजगार हमी योजनेच्या मजुरांना मजुरी न मिळाल्याबाबत**

**(९३) * १३५१२ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार, मोखाडा तालुक्यातील (जि.पालघर) अनेक गावांत रोजगार हमी योजनेच्या मजुरांना ४ महिने मजुरी न मिळाल्याने लाभार्थ्यांनी श्रमजीवी संघटनेतर्फे जव्हार तहसिलदार कार्यालयासमोर दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ पासून ठिय्या आंदोलन सुरु केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात रोजगार हमी योजने अंतर्गत लाभार्थ्यांना रोजची किती मजुरी दिली गेली व त्यापैकी किती मजूरी अखर्चित राहिली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) जव्हार तालुक्यातील नंदनमाळ गट क्र.८ चे माहे मे २०१५ चे ४०९ क्रमांकाचे ई-मस्टर कृषी विभागास वितरीत करण्यात आले होते. परंतु सदर ई-मस्टर मजूरांना मजूरी अदा करण्यासाठी वारंवार पत्र व्यवहार व अर्ध-शासकीय पत्रान्वये कळवून देखील मुदतीत सादर केले नाही. त्यामुळे संबंधित मजूरांना मजूरी वेळेत अदा करता आली नाही. सदरचे ई-मस्टर तालुका कृषी विभागाकडून दिनांक २५/०८/२०१५ रोजी प्राप्त झाले व त्याच दिवशी सदरील मस्टरचे निधी हस्तांतरण आदेश (FTO) तयार करुन e-FMS द्वारे पेमेंट करण्यात आले. सदर मजूरांच्या मजूरी विलंबाबाबत जबाबदार कर्मचाऱ्यावर तालुका कृषी अधिकारी यांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियामाअंतर्गत प्रशासकीय कार्यवाही केली आहे.

तसेच जव्हार तालुक्यातील चोथ्याची वाडी ते स्मशानभुमी रस्ता या कामावरील ई-मस्टरवर एकूण ४४ मजूरांनी काम केले होते. सदर मजूरांचे निधी हस्तांतरण आदेश (FTO) तयार करुन e-FMS द्वारे मुदतीत पेमेंट करण्यात आले होते. त्यापैकी एका मजूराला त्याचे पोस्ट खाते चालू असल्याने मुदतीत मजूरी अदा करण्यात आली मात्र उर्वरीत मजूरांचे पोस्ट खाते बंद स्थितीत असल्याने या मजूरांचे पोस्ट खाते दिनांक २५/०८/२०१५ रोजी चालु करुन मजूरांना मजूरी वितरीत करण्यात आली.
(३) रोजगार हमी योजनेअंतर्गत मजूरांनी केलेल्या कामासाठी कामाच्या मोजमापानुसार मजूरी अदा करण्यात आली आहे. २०१५-१६ या आर्थिक वर्षात जव्हार तालुक्यात रुपये २,५६,२५,३१५/-, तर मोखाडा तालुक्यात रुपये १,३५,१०,०३५/- इतकी रक्कम मजूरीवर खर्च झाली आहे. जव्हार व मोखाडा तालुक्यात अखर्चित मजूरी रक्कम निरंक आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**टेंबरे ग्रामपंचायतीमधील जामरुंग गावामध्ये (ता.कर्जत, जि.रायगड) जलयुक्त शिवार योजनेंतर्गत करण्यात आलेली निकृष्ट दर्जाची कामे**

**(९४) * १३५१० श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टेंबरे ग्रामपंचायतीमधील जामरुंग गावामध्ये (ता.कर्जत, जि.रायगड) जलयुक्त शिवार योजनेंतर्गत करण्यात आलेली कामे निकृष्ट दर्जाची झाल्याने मातीच्या बंधा-यात पावसाळयात पाणी साठत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत जामरुंग ग्रामपंचायतीने जिल्हाधिकारी, रायगड तसेच कृषि विभाग, कर्जत यांच्याकडे दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही. तथापि यासंदर्भात स्थानिक वर्तमान पत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) हे खरे नाही.

(३) वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने उपविभागिय कृषि अधिकारी खोपोली यांनी पाहणी केली असून कामे सुस्थितीत असल्याचे नमूद केलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जिल्हा सामान्य रुग्णालय (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील परिचारिकेच्या निवासस्थानाचे नुतनीकरणाबाबत**

**(९५) * १३७५९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा सामान्य रुग्णालय (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील परिचारिकेच्या निवासस्थानाच्या नुतनीकरणाबाबत काम हाती घेण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिचारिकांच्या निवासस्थांनाच्या नुतनीकरणासाठी निधी उपलब्ध न झाल्याचे काम अर्धवट स्थितीत बंद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवासस्थानासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

कामाचा पूर्ण निधी सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग यांच्याकडे वर्ग करण्यात आला होता व सदरचे बांधकाम दि. २८.१०.२०१५ रोजी पूर्ण झालेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वैनगंगा-नळगंगा नदीजोड योजनेद्वारे गोसीखुर्द प्रकल्पातील उपलब्ध असणारे अतिरिक्त पाणी विदर्भातील तुटीच्या भागात वळविण्याबाबत**

**(९६) * १३८०९ श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक १०३३८ ला दिनांक २१ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसीखुर्द प्रकल्पातील उपलब्ध असणारे अतिरिक्त पाणी विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड योजनेद्वारे विदर्भातील तुटीच्या भागात वळविण्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंबंधी राष्ट्रीय जलविकास अभिकरणास प्रकल्प अहवाल तयार करण्यास सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय,

(२) होय,

(३) राष्ट्रीय जलविकास अभिकरण यांनी तयार केलेल्या पूर्व अर्हता प्रकल्प अहवालानुसार प्रकल्प व्यवहार्य आहे. राज्य शासनाने दि.०६.०४.२०१५ चे पत्रान्वये राष्ट्रीय जलविकास अभिकरणास सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची विनंती केली असून सदर अभिकरणामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेचे काम प्रगतीत आहे.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.